बुधवार, ११ जानेवारी २०२३
⊙ किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१४३
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● WEDNESDAY 11 JANUARY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-143 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

## कोर्टातले कामकाज मी ठरवीन

### सरन्यायाधीश डी.वाय. चंद्रचूड यांनी वकिलाला सुनावले



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डी.वाय. चंद्रचूड यांनी वरिष्ठ वकील विकास सिंह यांना झापले आहे. विकास सिंह यांनी सर्वोच्च न्यायालयात खटला सूचिबद्ध करण्यावरून सरन्यायाधीशांकडे आग्रह केला. यावेळी सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी विकास सिंह यांना सुनावले. मला कोर्टातील कामकाजाबाबत सांगू नका, माझ्या कोर्टात कामकाज कसे चालणार, हे मी ठरवेन अशा शब्दांत सरन्यायाधीशांनी आपला संताप व्यक्त केला.**

वरिष्ठ वकील विकास सिंह यांनी वकिलांना चेंबर वाटपाच्या प्रकरणाचा उल्लेख करत, संबंधित खटला याच आठवड्यात सूचिबद्ध करण्यात यावा, अशी मागणी केली. तथापि, सरन्यायाधीशांनी त्यांना सांगितले की, हे प्रकरण या आठवड्यात सूचीबद्ध करणे थोडे कठीण आहे. त्यामुळे याची सुनावणी ३ फेब्रुवारीला करता येईल. पण विकास सिंह यांनी हे प्रकरण लवकरात लवकर सुनावणीसाठी घेण्याचा आग्रह धरला. तसेच सूचीबद्ध प्रकरणांची सुनावणी करणे, हे न्यायालयाचे काम आहे, असा युक्तीवाद सिंह यांनी केला. यानंतर सरन्यायाधीश चंद्रचूड म्हणाले, मला कामकाज कसे करायचे हे सांगू नका, माझ्या कोर्टात कामकाज कसं चालणार, हे मी ठरवेन. काल माझ्याकडे वेळ नव्हता, त्यामुळे मी सुनावणी घेऊ शकलो नाही. संध्याकाळी ६ वाजता सुनावणी ठेवली तर याचा वकिलांना त्रास होईल. तसेच माझ्याकडेही इतर प्रशासकीय कामे आहेत, अशा शब्दांच सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी वरिष्ठ वकील विकास सिंह यांना झापले.



## चर्चेतली बातमी

### सत्तासंघर्षावर १४ फेब्रुवारीला सुनावणी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्रातील मागील सहा महिन्यांपासून महाराष्ट्रातील १६ आमदारांच्या अपत्रातेचा मुद्दा आणि सत्तासंघर्षावर मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडणार होती. पण, आता ही सुनावणी पुढे ढकलण्यात आली आहे. १४ फेब्रुवारीपासून सलग सुनावणी सुरु होणार असल्याची माहिती शिवसेना खासदार संजय राऊत यांनी दिली आहे. या प्रकरणावरती बिंदू माधव ठाकरे यांचे सुपूत्र वकील निहार ठाकरे यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. निहार ठाकरे हे शिंदे गटाकडून सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडत आहे. पुढील सुनावणीबद्दल 'एबीपी माझा'शी बोलताना निहार ठाकरे म्हणाले, जे सत्य आहे, त्याचाच विजय होणार आहे. नबाम रेबिया प्रकरणात न्यायालयाने योग्य निर्णय दिला आहे. अध्यक्ष आणि उपाध्यक्षांवर अविश्वास ठराव आणण्यात आला, म्हणजे त्यांच्यावर आमदारांचा विश्वास नाही, असा अर्थ होतो. त्यामुळे ती व्यक्ती आमदारांना अपात्र करु शकते का? हा मुद्दा आहे. नबाम रेबिया प्रकरणत म्हटले की, आधी विधानसभा अध्यक्षांनी स्वतःचे बहुमत सिद्ध केले पाहिजे.



श्रीक्षेत्र राजूर:अंगारकी चतुर्थीनिमित्त श्री राजुरेश्वर महागणपती मंदिराच्या कळसावर तिरंगी रंगातील आकर्षण विद्युत रोषणाई करण्यात आली.

## नाशिकमध्ये पुन्हा 'द बर्निंग ट्रक'चा थरार

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** जिल्ह्यात पुन्हा एकदा बर्निंग ट्रकचा थरार पाहायला मिळाला आहे. सिन्नर-घोटी मार्गावर घोरवड घाटात आज सकाळी सात वाजेच्या सुमारास धावत्या ट्रकला अचानक आग लागल्याची घटना घडली आहे. या आगीत ट्रक पूर्णपणे जळून खाक झाला. या ट्रकमध्ये प्लास्टिक भरलेलं होतं, असं समजतंय. ट्रकमध्ये प्लास्टिक असल्यामुळे आगीने काही क्षणातच रौद्र रूप धारण केलं होतं. आगीचे लोळच्या लोळ हवेत उठत होते. त्यानंतर घटनास्थळावर सिन्नर नगरपरिषदेच्या अग्निशमन विभागाला पाचरण करण्यात आले. पथकाने शर्तीचे प्रयत्न करीत आग आटोक्यात आणली. या घटनेत ट्रक चालक वेळीच बाहेर पडल्याने तो वाचला. हा ट्रक (क्र.- एमएच ४८बीएम १६७६) घोटीहून सिन्नरच्या दिशेने जात होता. दरम्यान या धावत्या ट्रकला सिन्नर-घोटी मार्गावर घोरवड घाटात अचानक आग लागली. पाहता पाहता आगीने रौद्ररूप धारण केलं. ट्रकमध्ये प्लास्टिक असल्याने आगीचा भडका उडाला. काही क्षणांत ट्रक पूर्णपणे आगीच्या विळख्यात गेला होता. आग आटोक्यात येईपर्यंत हा ट्रक पूर्णपणे जळून खाक झाला, अशी माहिती आहे.आगीची माहिती मिळताच एमआयडीसी अग्निशमन दलाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. लाला वाल्मिकी, नवनाथ जोंधळे, आकाश देवकर, लक्ष्मण सोनकुसरे, जयेश बोरसे आदींच्या पथकाने ही आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले. अखेर मोठ्या प्रयत्नानंतर ही आग आटोक्यात आली. मात्र, तोपर्यंत ट्रकची राख झाली होती. वाहनं अचानक पेट घेत असल्याच्या घटना सातत्याने घडताना दिसत आहेत. मुंबईतील परळ पुलावर कालच ट्रकला भीषण आग लागल्याची घटना घडली होती.



## देशात भाजपा सरकारच्या विरोधात प्रचंड चीड

### नाना पटोले : शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी व वीज बिल माफीसह विविध ठराव मंजूर

आधुनिक केसरी न्यूज


नागपूर : देशात भाजपा सरकारच्या विरोधात प्रचंड चिड असून शेतकरी, तरुणाई बरबाद करायची व्यवस्था मोदी सरकारची आहे. भाजपा सरकारविरोधात जनतेत संतापाची लाट असून राहुलजी गांधी यांनी मांडलेल्या भूमिकेला जनतेचा मोठा प्रतिसाद मिळत आहे.
भारत जोडो यात्रेला देशात प्रतिसाद मिळालाच पण महाराष्ट्रानेही अभूतपूर्व प्रतिसाद देऊन ही पदयात्रा यशस्वी केली आहे. आता हाच संदेश घेऊन हाथ से हाथ जोडो अभियान राज्यात राबविले जाणार असून हे अभियान काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये मोठी ऊर्जा निर्माण करणारे आहे, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे.
नागपूरच्या राणी कोठी येथे प्रदेश काँग्रेसच्या विस्तारित कार्यकारिणीची बैठक पार पडली. या बैठकीत नाना पटोले बोलत होते. ही बैठक प्रांताध्यक्ष नाना पटोले यांच्या अध्यक्षतेखाली व 'हाथ से हाथ जोडो' अभियानाचे महाराष्ट्र प्रभारी माजी केंद्रीय मंत्री पल्लम राजू, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, माजी मंत्री डॉ. नितीन राऊत, सुनील केदार, विजय वडेट्टीवार, खा. बाळूभाऊ धानोरकर, तेलंगणाचे प्रभारी माणिकराव ठाकरे, माजी केंद्रीय मंत्री विलास मुत्तेमवार, प्रदेश कार्याध्यक्ष माजी मंत्री नसीम खान, माजी मंत्री बसवराज पाटील, आ. प्रणिती शिंदे, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या सचिव व सहप्रभारी सोनल पटेल, महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष संध्याताई सव्वालाखे, सेवादलाचे प्रदेशाध्यक्ष विलास औताडे, मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, प्रदेश सरचिटणीस देवानंद पवार, प्रमोद मोरे, नागपूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आ. विकास ठाकरे, नागपूर ग्रामीण जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष माजी मंत्री राजेंद्र मुळक यांच्यासह काँग्रेस नेते व पदाधिकारी उपस्थित होते.




१) भारत जोडो यात्रेबद्दल राहुल गांधी यांचे अभिनंदन करणारा व महाराष्ट्रातील जनतेने या यात्रेला अभूतपूर्व प्रतिसाद दिल्याबद्दल राज्यातील जनतेचे आभार व्यक्त करणारा ठराव मांडून संमत करण्यात आला. हा ठराव माजी केंद्रीय मंत्री विलास मुत्तेमवार यांनी मांडला व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी त्याला अनुमोदन दिले.
२) पदयात्रा यशस्वी करण्यासाठी अहोरात्र मेहनत केल्याबद्दल सर्व पदाधिकाऱ्यांचे जाहीर आभार व्यक्त करणारा ठराव मांडून तो संमत करण्यात आला. हा ठराव माजी मंत्री विजय वडेट्टीवार यांनी मांडला आणि प्रदेश उपाध्यक्ष नाना गावंडे यांनी त्याला अनुमोदन दिले.
३) केंद्र व राज्यातील भारतीय जनता पक्षाचे सरकार शेतकरी विरोधी असून त्याचा निषेध करणारा ठराव मांडून संमत करण्यात आला. माजी मंत्री व प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान यांनी मांडला व प्रदेश कार्याध्यक्ष आ. प्रणिती शिंदे यांनी अनुमोदन दिले.
४) राज्यातील शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी व वीजबिल माफी देण्यात यावी हा ठरावही मांडून संमत करण्यात आला. हा ठराव माजी मंत्री डॉ नितीन राऊत यांनी मांडला व माजी मंत्री सुनील केदार यांनी ठरावाला अनुमोदन दिले.
५) गडचिरोली जिल्ह्यातील सुरजागड लोहखनिज प्रकल्प उभा करुन राज्यातील तरुणांना रोजगार मिळावा व राज्याला महसूल मिळेला यासाठीचा ठराव मांडून तोही संमत करण्यात आला. आ. अभिजीत वंजारी यांनी हा ठराव मांडला व आ. वजाहत मिर्झा यांनी ठरावाला अनुमोदन दिले. याशिवाय SC- ST प्रर्वगातील प्रमोशन, बिहारच्या धर्तीवर महाराष्ट्रात जातीगत जनगणना करावी, तसेच नोकर भरतीचा करावी. हे ठरावही मांडून एकमताने संमत करण्यात आले.

## उगवतीचे रंग






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# कवितांच्या गावा जावे...

आधुनिक केसरी



जीवनाचं गाणं ती गात असते. ' माझे जीवनगाणे...' मध्ये एखादा कवी बोलून जातो की ' व्यथा असो आनंद असू दे, गात पुढे मज जाणे...,ग. दि. माडगूळकरांसारखा सिद्धहस्त कवी लिहून जातो , ' दैवजात दुःखे भरता , दोष ना कुणाचा, पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा...' किंवा ' घनतिमिरी शुक्र बघ राज्य करी, रे खिन्न मना बघ जरा तरी...' या सारख्या सुंदर कवितांचे गाणे झाले. लेक सासरी जाताना पित्याच्या हृदयात होणारी कालवाकालव, 'दाटून कंठ येतो, ओठात येई गाणे, जा आपुल्या घरी तू, जा लाडके सुखाने...' ऐकणाऱ्याच्या डोळ्यात नकळत पाणी आणते. अशा खूप विविधरंगी कविता. किती सांगाव्यात. कधी कधी जीवन शुष्क वाटते, जीवनातला रस संपल्यासारखे वाटते, तेव्हा अशा कविता मनाला उभारी देतात. शहाणपणाचे दोन शब्द सांगतात. विंदा करंदीकरांची ' देणाऱ्याने देत जावे ...' ही अशीच एक कविता. कोणाकडून काय घेता येईल ते विंदा फार सुंदर सांगतात. देणाऱ्याने देत जावे "देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे, हिरव्या पिवळ्या माळावरुनी, सह्याद्रीच्या कड्यावरुनी, छातीसाठी ढाल घ्यावी, वेड्यापिशा ढगाकडून वेडेपिसे आकार घ्यावे, रक्तामधल्या प्रश्नासाठी, पृथ्वीकडून होकार घ्यावे, उसळलेल्या दर्याकडून, पिसाळलेली आयाळ घ्यावी, भरलेल्या भिमेकडून, तुकोबाची माळ घ्यावी, देणाऱ्याने देत जावे घेणाऱ्याने घेत जावे, घेता घेता एक दिवस, देणाऱ्याचे हात घ्यावे."! या कवितेतील ' हिरव्या पिवळ्या माळावरून सह्याद्रीच्या कड्यावरून छातीसाठी ढाल घ्यावी...' या ओळी मरगळलेल्या मनाला उभारी देणाऱ्या आहेत. पिचलेल्या मनात जोश भरणाऱ्या आहेत. कधी कधी जीवन खूपच आखीव रेखीव, साचेबद्ध होते. त्याच त्या रुटीनचा कंटाळा येतो. अशा वेळी विंदा सांगतात, ' वेड्यापिशा ढगांकडून वेडेपिसे आकार घ्यावे..' कधी कधी चाकोरीबद्ध आयुष्य तेवढ्यापुरतं सोडूनही द्यावं. एखाद्या ' उनाड दिवसासारखं...' कधी कधी आपले प्रश्न आपल्याला सुटत नाहीत. **क्रमशः**



## आनंदी पहाट

# व्यक्तीच्या वेगळेपणाचे महत्व

आधुनिक केसरी

आपल्या संवादातून, लेखनातून, देहबोलीद्वारे आणि विविध क्रिया-प्रतिक्रियांतून आपण व्यक्त होत असतो. व्यक्त न होणाऱ्या व्यक्तीची घुसमट वाढत जाते. मोकळेपणानं मनांतील विषय एखाद्याला सांगितले कि मनावरचा ताण, दडपण कमी झाल्याचं देखील जाणवतं. ह्या मोकळ्या होण्यातून आपल्या समस्यांचं निराकरण होत जातं. काहीवेळा उद्‌भवलेल्या प्रश्नांची उकल होत जाते. मनातील भय, न्यूनगंड दूर होण्याच्या दृष्टीनं मोकळेपणानं आपल्या मनांतील शंका व्यक्त करणं उपयुक्त ठरतं. आपल्याला पडलेले प्रश्न केवळ आपल्याच भ्रम आणि संभ्रमामुळे निर्माण होत असतात. प्रत्येक वेळेला प्रत्येक प्रश्नाची उत्तरं सारखी नसतात, प्रत्येकाचे प्रश्न निराळे असतात, उत्तरेही प्रत्येकासाठी भिन्न असतात. जसं व्यक्ती तितक्या प्रकृती तसंच, जसे प्रश्न तशी त्यांच्यासाठी उत्तरे, हे लक्षात घेणं जरुरीचं असतं. एखाद्या समस्येचं उत्तर सर्वांनाच लागू होतं असं नाही, हेही समजून घेणं आवश्यक असतं.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

व्यक्त होणारीच व्यक्ती असते; अशाच व्यक्तीचं व्यक्तिमत्व चार चौघांपेक्षा निराळं असतं. खरं तर, व्यक्त न होणारा जीव ह्या भूतलावर सापडणे विरळाच. जन्माला आलेला प्रत्येक जीव काही ना काही प्रकारे व्यक्त होण्याचा प्रयत्न करतच असतो. ते व्यक्त होणं आवाजाच्या माध्यमातून, लिखित स्वरूपांत, देहबोलीच्या वापरांतून होत असतं.

आपल्या अंतर्मनांत येणारे विचार, विषय, घटना, अनुभव आपण अगदी जवळच्या, आपल्या हक्काच्या व्यक्तीजवळ बोलून दाखवत असतो. म्हणजेच एकप्रकारे आपण व्यक्तच होत असतो. तसं करण्यामुळे आपल्या मनांत साठून राहिलेल्या विचार बाहेर पडतात, त्यांना मोकळी वाट करून दिली जाते. निसर्ग नियमानुसार ते गरजेचं असतं.



आधुनिक केसरी

अविरत ओठी यावे नाम
श्रीराम जय राम जयजय राम
रामनाम हे सदा सुखाचे
निधान जाणा परमेशाचे
पतीतपावन अवघे नाम
श्रीराम जय राम जयजय राम

जानकीची जणु जीवनज्योती
प्रभु रामाची कोमल मूर्ती
मंगल दर्शन पूर्ण विराम
श्रीराम जय राम जयजय राम
पंचप्राण हे पवनसूताचे
राम जणू निःश्वास तयांचे
तनू संजीवन सुंदर धाम
श्रीराम जय राम जयजय राम

## निरुपण

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**मार्ग नवे असो वा जुने. त्यांची स्वीकार्यता नवेपणा किंवा जुनेपणा यावर आधारित नसते. फक्त एकच; मार्ग स्वीकारताना कोणी दुखावणार नाही याची जरा काळजी घ्या.**

**जीवन तुमचे आहे. कार्य रचनात्मक असेल तर लोक काय म्हणतील म्हणून थांबू नका. लोक उगवत्या सूर्याला प्रणाम करतातच!**


# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

आधुनिक केसरी

**ज्योति पुञ्ज परकाश है, एक अंग मह जाहि ।**
**अणू तेज में तेज सब, रबि शशि अग्निहिं ताहि ।।७३।। (स्वर्वेद पंचम मण्डल अष्टम अध्याय) ०५/०८/७३**

**मराठी अनुवाद :**

तो परमेश्वर सर्व ज्योतींचा प्रकाशांचा पुंज आहे. त्याच्या एक अंगच्या प्रकाशाने अखिल विश्वाचा प्रकाश प्रकाशत आहे. त्याच्या अणू मात्र तेजात सर्व सूर्य, चंद्र तसेच अग्निचं तेज, प्रकाश प्रकाशीत होत आहे.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.**

## बध्दमुक्तनिरूपण

आधुनिक केसरी

अद्वेत ब्रम्हाचे दर्शन झाल्यावर असे वाटते की "देव पहाया गेलो देव होऊन ठेलो( रहावे )असे वाटले. परत कधीही या संसाराच्या मोहपाशात अडकू नये असे ब्रम्ह निर्गुण निराकार आहे. देहबुध्दीच्या व्रुत्तीवर मन जर पूर्णपणे तदाकार झाले तर तुझे माझे हा भेदच मनातून नाहीसा व्हावा. ब्रम्ह रूपाशी एकरूप झाल्यावर पुन्हा संसारात गुंतणे आणि सामान्य व्यवहार करणेहे बरोबर नाही. तो जरपरत संसारात देहबुद्धीत येत असेल तर त्याचे ज्ञान पक्के नाही असे समजावे. ज्ञान न समजल्याने ब्रम्ह एकतर हातचे जाते आणि परमार्थाच्या नावाखाली संसार पण हातचा सुटतो. असा हा पाठशिवणीचा खेळ सतत चालु असतो. यासाठी वेदपुराण काळातील ऊदाहरण दिले आहे. ते पुढील प्रमाणे. शुक किंवा वामदेव हे मुक्त झाले असे वेदवचन आहे. आरंभापासून अखेरपर्यंत ते दोघेच मुक्त झाले असा या वचनाचा अर्थ आहे. वेदवचन चुकीचे असणार नाही. मुक्त व ज्ञानी पुरूषांची नावे ,भक्त प्रल्हाद, नारद,पराशर,पुंडलीक, व्यास,अंबरीष,शुक,शौनक,भीष्म,दाल्भ्य, रूक्मागंद,अर्जुन, वसिष्ठ, बिभीषण हे सर्व महानभक्त पुण्यपुरूष होऊन गेले. कवि,हरि,अंतरिक्ष,प्रबुद्ध, पिप्पलायन,अविर्होत्र,द्रुमिल,चमस,करभाजन हे नवनारायणरूप महात्मे मोठे ज्ञानी व मुक्त पुरूष होऊन गेले. म्हणजेच वेदांचे ज्ञान पूर्ण पणे समजून घेतले पाहिजे अर्धवट ज्ञान म्हणजे पढतमूर्ख पणा होय.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## हरिपाठ


आधुनिक केसरी

**"तेव्हां निर्गुण परमात्मा निश्चळ । निर्गुण भक्ती तेहि अचळ ।सायोज्यमुक्ती ते केवळ । जाणिजे ऐसी ॥ २९॥"** {याप्रमाणे कल्पांत जरी ओढवला तरी निर्गुण निश्चळ परमात्मा जशाच्या तसाच असतो. तो नाहीसा होत नाही. त्याचप्रमाणे निर्गुण भक्तीही अचलच असते. तिचाही नाश होत नाही.

# नाम व विकल्प !

आधुनिक केसरी

नाम घेऊ लागले की विकल्प उठतात आणि ते घेण्याबद्दलची निष्ठा कमी होते, याला काय करावे ? अशी तक्रार आपण सर्वसाधारणपणे करतो; पण असे होण्यातच नामाचे महत्त्व प्रस्थापित होते हे आपल्या लक्षात येत नाही. मनुष्य नाम घेऊ लागला की विकल्पांना असह्य होते, आणि आता हा नाम घेऊ लागला, आता आपली धडगत नाही, अशा धास्तीने त्यांची चळवळ चालू होते, आणि मनुष्याला नामापासून परावृत्त करण्याचा ते प्रयत्न करतात. विकल्प हे अती सूक्ष्म आहेत. त्यांचे उच्चाटन करायला त्यांच्यापर्यंत पोहोचणारा आणि तितकाच सूक्ष्म असा उपाय पाहिजे. तो उपाय म्हणजे भगवंताचे नाम. एखाद्या बिळात सर्प शिरला तर त्याला बाहेर काढण्याकरिता त्याच्यापर्यंत पोहोचून त्याला तिथे राहणे असह्य करील असाच उपाय करणे जरूर असते. बाहेरून कितीही आरडाओरडा केला तरी त्याचा उपयोग होत नाही. बिळात धूर किंवा गरम पाणी सोडले की तो बाहेर येतो. त्याप्रमाणे, नाम घेतले की विकल्प उठतात, म्हणजे विकल्पांच्या मूळ ठिकाणापर्यंत नामाची आच जाऊन पोचली असे ठरते. तर मग नाम घेऊ लागल्यावर विकल्प येऊ लागले तर गांगरून न जाता, हे सुचिन्ह आहे असे समजून, विकल्पांच्या उच्चाटनाची गुरुकिल्ली मिळाली अशा जाणिवेने, जास्त आस्थेने नाम घेण्याचा निश्चय करावा, हाच त्याला उपाय. नामाबद्दल सुरुवातीला सर्वांचीच वृत्ती साशंक असते, पण आपण सतत नाम घेत गेल्यानेच विकल्प कमी होतात. कोणतीही गोष्ट अभ्यासानेच साध्य होत असते. आज खरी भक्ती नाही म्हणून भगवंताचे स्मरण नाही; आणि भगवंताचे स्मरण ठेवण्याचा अभ्यास केल्याशिवाय खरी भक्ती येत नाही. शहाण्या माणसाने उगीच विकल्प न लढविता भगवंताचे स्मरण ठेवायला आरंभ करावा. विकल्प जाऊन भगवंताचे संकल्प उठू लागले की आपले काम झाले. आपण रस्त्याने चाललो की नको ती माणसे भेटायचीच; पण आपण आपले चालणे चालू ठेवावे. तसे, विकल्प आले तरी आपण आपले नाम सोडू नये. पण गंमत अशी होते की, वाईट मनुष्य भेटला आणि आपण त्याच्याकडे लक्ष द्यायचे नाही असे म्हटले तरी, तो मुद्दाम खाकरतो आणि आपले लक्ष वेधतो. अशा वेळी त्याच्याकडे पाहूनही आपण दुर्लक्ष करतो. त्याचप्रमाणे विकल्पांनी आपले लक्ष ओढून घेतले तर नावडीने लक्ष द्यावे पण आपले नाम सोडू नये. शंका घ्यायचीच झाली तर नाम चालू ठेवून घ्या, म्हणजे ते नामच शंकांचे निरसन करील आणि विकल्पांनाही हळूहळू पायबंद घालील. **आजचे बोधवचन आहे- पुष्कळ केलेले शंकेने व्यर्थ जाते. आपण नाम सोडणार नाही हे नक्की ठरविले की आपली वृत्ती निःशंक होतेच होते.**



# तर महाराष्ट्र आणि राष्ट्रवादी काँग्रेसही हे खपवून घेणार नाही : अजित पवार

## राष्ट्रवादीची बैठक; वेगवेगळ्या घटनांसाठी पक्षाची रणनीती ठरणार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : आज प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. गेल्या काही दिवसांपासून राज्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या घटना घडत आहेत त्या घटना घडत असताना सत्ताधारी पक्ष वातावरण निर्मिती करण्याचा प्रयत्न करत आहे. महागाई, बेरोजगारी या महत्त्वाच्या प्रश्नावरुन लक्ष दुसरीकडे वळवण्याचा प्रयत्न आहे. त्यावर चर्चा बैठकीत झाली व रणनीती ठरवण्यात आली अशी माहिती विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी माध्यमांशी बोलताना दिली दिली.**



राष्ट्रवादी काँग्रेस पहिल्यापासून शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचारधारेने पुढे जात आहे. पुरोगामी विचार घेऊन पवारसाहेबांनी राजकीय जीवनाला सुरुवात केली. तेव्हापासून यशवंतराव चव्हाणांच्या विचारांनी पुढे जात असतो. आमच्या पक्षात सर्व धर्माला न्याय देण्याचा प्रयत्न आहे. घटना, कायदा, संविधानाला धरून देश आणि राज्य चालले पाहिजे या मताची राष्ट्रवादी काँग्रेस आहे. त्यामुळे जो काही बाऊ करतात त्याला काडीचा आधार नाही आम्ही पण अनेक वर्षे राज्यकर्ते म्हणून काम केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसची भूमिका स्पष्टपणे जनतेसमोर ठेवण्याचे काम पवारसाहेबांनी केले आहे. सत्ताधारी पक्षाच्या पोटात दुखत असेल म्हणून ते अपप्रचार करण्याचा केविलवाणा प्रयत्न करत आहे त्याच्याशी आमचा दुरान्वये संबंध नाही आम्ही आमच्या भूमिकेनेच पुढे जाणार आहे असेही अजित पवार यांनी स्पष्ट केले.

आपल्या नागरिकांबाबत चुकीचे घडले असेल तर कारवाई केली पाहिजे परंतु सत्ताधारी पक्षाचा असणारा उगीचच विरोधकांना त्रास देण्याचा आणि गोवण्याचा प्रयत्न करत असेल तर ते कुणीही सहन करणार नाही. जितेंद्र आव्हाड यांच्यावर दोन गुन्हे दाखल केले होते त्यातून त्रासून राजीनामा देण्याची भूमिका त्यांनी घेतली होती. वास्तविक चुका असतील मग माझ्या किंवा कुणाच्याही असोत त्याच्यावर कारवाई करावी परंतु मुद्दाम कुभांड रचून कुणाला अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला. कुणालातरी पुढे करुन गुन्हा दाखल करायला लावणे ही महाराष्ट्राची परंपरा नाही. आम्ही तर १९९९ ते २०१४ ते २०२२ असे साडेसतरा वर्ष सत्तेत काम केले आहे. आमच्या काळात विरोधक होते पण असा प्रयत्न केलेला नाही. त्यामुळे असा प्रयत्न कुणी केला तर जनता हे बारकाईने बघत असते त्यामुळे आम्ही हे सहन करणार नाही. जाणीवपूर्वक गोवण्याचा, त्रास देण्याचा प्रयत्न राजकीय विरोधक आहे म्हणून त्यांना संपवण्याचा प्रयत्न कोण करु पहात असेल तर हे महाराष्ट्र कदापीही सहन करणार नाही आणि राष्ट्रवादी काँग्रेसही खपवून घेणार नाही असा निर्वाणीचा इशारा अजित पवार यांनी सरकारला दिला. जितेंद्र आव्हाड यांच्यावर बलात्काराची केस दाखल होईल अशी चर्चा आहे असा प्रश्न पत्रकारांनी विचारला असता बलात्कार न करता गुन्हा दाखल करु शकता का? तर ही मोघलाईच लागलीय असा संतप्त सवालही अजित पवार यांनी केला. असे व्हायला लागले तर यावरून महाराष्ट्रात उठाव होईल. महाराष्ट्र शांत किंवा गप्प बसणार नाही. लोकांनाही कळते आहे की, कशापद्धतीने गोवण्यात येत आहे आणि इतक्या खालच्या पातळीवर राज्यातील राजकारण जाणार असेल आणि सरकारी यंत्रणांचा वापर होणार असेल तर आम्हालाही वेगवेगळ्या आयुधांचा वापर करता येईल. असा अन्याय होत असेल तर अन्यायाला वाचा फोडण्यासाठी आम्ही मूग गिळून बसलेलो नाही असेही अजित पवार यांनी ठणकावून सांगितले आहे.



# उर्फीचा खरंच चित्रा वाघ यांच्या मुलावर जीव जडलाय का?

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मागच्या काही दिवसांपासून सातत्याने भाजपाच्या महिला प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ आणि मॉडेल उर्फी जावेद यांच्यामध्ये कलगीतुरा रंगला आहे. चित्रा वाघ यांनी उर्फीच्या तोकड्या कपड्यांवर आक्षेप घेत तिच्यावर कारवाई करण्याची मागणी मुंबई पोलिसांकडे केली होती. यासंदर्भात त्यांनी पत्रही दिले होते. त्यावर 'माझा नंगानाच सुरूच राहील', असे उत्तर उर्फीने दिले होते.

दोघींचे भांडण वाढल्यानंतर उर्फी ट्विटरवर चारोळ्या टाकत चित्रा वाघ यांनी डिवचत आहे. चित्रा वाघ जी आय लव्ह यू, असे ट्वीट करत तिने एक फोटो टाकला होता. दरम्यान, सातत्याने उर्फी जावेद चित्रा वाघ यांचा सासू म्हणत उल्लेख करत आहे. यामुळे उर्फीचा खरंच चित्रा वाघ यांच्या मुलावर जीव जडलाय का? अशी मिश्किल टिप्पणीही अनेक जण करत आहेत. अशातच तुम्हाला कदाचित माहित नसेल पण चित्रा वाघ यांना एक मुलगा आहे आणि त्याचं नाव आदित्य वाघ आहे. आता चित्रा वाघ व उर्फी जावेद यांच्यातील हा शाब्दिक वाद कधी थांबेल की उर्फी जावेद अशी त्यांना ट्वीट करून डिवचत राहील, हे येत्या काळातच कळेल.

# आपेगाव शिवारात बिबट्याचे दर्शन

## याच परिसरात बाप लेकाचा घेतला होता बळी

आधुनिक केसरी न्यूज



**दादासाहेब घोडके**

**पैठण :** तालुक्यातील आपेगाव परिसरात बिबट्या दिसून आला असल्याने पुन्हा हल्याची पुनरावृत्ती होते की काय या धास्तीने शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या दोन वर्षापूर्वी आपेगाव शिवारातील रामतीर्थ परिसरात बिबट्याचे आपेगाव येथील बाप लेकाचा फडशा पाडुन बळी घेतला होता. ही भीती संपते नाही तोच मंगळवारी १० रोजी पुन्हा आपेगाव येथील तरुण शेतकरी प्रविण औटे यांच्या शेतात ऊस लागवडीची लगबग चालू असताना दुपारच्या वेळेत अचानक समोरच्या शेतात बिबट्या दिसल्याने त्यांनी त्याच्याच मोबाईलमध्ये फोटो काढले. परंतु काही वेळात शेतकरी समुहाने दिसल्याने बिबट्या तेथून पसार झाला. त्यामुळे आपेगाव परिसरात पुन्हा शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण पसरल्याने सध्या सोंगणीस आलेल्या तुरी व ऊस लागवडीसाठी शेतात जाणे जरा भीतीचे झाले आहे. याबाबत वन विभागाने लक्ष देऊन पाहणी करण्याची मागणी शेतकरी करत आहेत.

# जिजाऊ सृष्टी नटली; सर्वपक्षीय नेत्यांची मांदियाळी

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** मराठा सेवा संघाच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात येणाऱ्या जिजाऊ जन्मोत्सव सोहळ्याची जय्यत तयारी आता अंतिम टप्प्यात आहे. यानिमित्त जिजाऊ सृष्टी व राजमाताचे जन्मस्थान असलेला राजवाडा नटला असून मुख्य सोहळा १२ जानेवारीला पार पडणार असून खा. उदयनराजे भोसले यांची प्रमुख उपस्थिती, मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष ॲड. पुरुषोत्तम खेडेकर यांचे मुख्य मार्गदर्शन आणि सर्व पक्षीय नेत्यांची मांदियाळी यंदाच्या सोहळ्याचे आकर्षण ठरणार आहे. १० व ११ जानेवारी दरम्यान जिजाऊ गाथा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.

# मेट्रोचा खांब कोसळल्याने अडीच वर्षांच्या मुलासह आईचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**बंगळुरू :** मेट्रोचा खांब कोसळल्याने अडीच वर्षांच्या मुलासह आईचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना बंगळुरूच्या नागवारा भागात मंगळवारी सकाळच्या सुमारास घडली. तेसस्विनी (२५) आणि विहान (२.५) अशी या दोघांनी नावे आहेत. दरम्यान, या घटनेत विहानचे वडील जखमी झाले असून त्यांना उपचाराकरिता रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. इंडिया टुडेने दिलेल्या वृत्तानुसार, २५ वर्षीय तेजस्विनी आपल्या पती आणि अडीच वर्षाच्या मुलासह बाईकने हेब्बलच्या दिशेने जात होते. यावेळी नागवारा पोहोचताच अचानक एक अंडर कंस्ट्रक्शन मेट्रोचा खांब त्यांच्या अंगावर पडला. या घटनेत तेजस्विनी आणि तिच्या मुलाचा मृत्यू झाला तर, तिचे जखमी झाले असून त्यांना स्थानिक सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

दरम्यान, यासंदर्भात बोलताना बंगळुरू ईस्टचे डीसीपी भीमाशंकर गुलेड म्हणाले, हे दाम्पत्य आपल्या मुलासह हेब्बलच्या दिशेने जात होते. मात्र, मेट्रो खांब ओव्हरलोड झाल्याने अचानक त्यांच्या अगावर कोसळला. स्थानिकांनी तत्काळ त्यांना रुग्णालायात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी आई आणि मुलाला मृत घोषित केले. याप्रकरणी आम्ही पुढील तपास सुरू आहे.




नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा

- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट



महावीर
घर संसार

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738

रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117

व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181

वितरण स्थिती 9021395308 9657398232

घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, औरंगाबाद

# केसीआर यांना धक्का

आधुनिक केसरी

तेलंगणात यंदा विधानसभेचा रणसंग्राण रंगणार आहे. त्यासाठी भाजपाने तयारीला सुरुवात केली आहे. भारत राष्ट्र समितीला ( बीआरएस) भाजपा मोठा धक्का देण्याच्या तयारीत आहे. बीआरएसचे नेते आणि खम्मम मतदारसंघाचे माजी खासदार पोंगुलेटी श्रीनिवास रेड्डी हे भाजपात प्रवेश करण्याची शक्यता आहे. त्याच पार्श्वभूमीवर १८ जानेवारीला ते दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची घेणार आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, १६ आणि १७ जानेवारीला भाजपा राष्ट्रीय कार्यकारणीची बैठक पार पडणार आहे. त्या बैठकीनंतर रेड्डी भाजपात प्रवेश करतील, असे सांगण्यात येत आहे. पण, रेड्डी यांच्याकडून याबाबत कोणतीही अधिकृत भाष्य करण्यात आलं नाही. रेड्डी यांनी भाजपात प्रवेश केल्यावर विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री के चंद्रशेखर राव यांच्या अडचणीत वाढ होऊ शकते, अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष बंदी संजय यांनी खम्मम येथे एक पदायात्रा काढणार होते. या यात्रेतच श्रीनिवास रेड्डी भाजपात प्रवेश करणार असल्याची माहिती होती. पण, काही कारणास्तव हा प्रवेश होऊ शकला नाही. काही दिवसांपूर्वी कार्यकर्त्यांच्या बैठकीत रेड्डी यांनी सांगितले की, बीआरएस पक्षाशिवाय आपल्याला जनतेचा मोठा पाठिंबा आहे. रेड्डी यांच्या विधानानंतर त्यांच्या सुरक्षेत कपात करण्यात आली होती. २०१४ साली रेड्डी यांनी युवाजना श्रमिका रायतू काँग्रेस पार्टीकडून (वायएसआरसीपी) लोकसभेची निवडणूक लढवली होती. या पक्षाचे प्रदेशाध्यक्षही ते राहिले होते. आंध्रप्रदेशचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे दिवंगत नेते वाईएस राजशेखर रेड्डी यांच्याबरोबर रेड्डी यांचे कौटुंबिक संबंध राहिले आहेत. त्यामुळे रेड्डी हे वायएसआरसीपी प्रमुख वाईएस शर्मिला यांच्याबरोबर जाण्याची शक्यता होती. पण, २०१८ साली झालेल्या विधानसभा २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत बीआरएसच्या उमेदवारांना रेड्डी यांनी समर्थन दिले होते.

# प्रवासी भारतीय दिवस : एक दृष्टिक्षेप



दुशांत बाबुराव निमकर
संपर्क क्र. 9765548949

आधुनिक केसरी

**लोकसंख्येच्या दृष्टीने जगात भारताचा दुसरा क्रमांक लागतो.तरुणांची संख्या देशात सर्वाधिक आहे त्यामुळे उत्पादक लोकसंख्या असल्याने जगाच्या पाठीवर वेगवेगळ्या देशात स्थलांतरित झालेले आहे आणि नोकरी, व्यवसाय व सेवांच्या बाबतीत तिथेच स्थायिक झालेले आहेत. मूळ भारतीय वंशाचे असलेले पण परदेशात स्थायिक झालेल्या भारतीय नागरिकांचे मूळ देशाला फायदा व्हावा यासाठी प्रवासी भारतीय दिवस साजरे करण्याची कल्पना भूतपूर्व पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी मांडली.**

प्रथमतः ८-९ जानेवारी २००३ साली नवी दिल्ली येथे प्रवासी भारतीय दिन साजरा करण्यात आला. अनिवासी भारतीय लोकांसाठी आपली भाषा, संस्कृती व वारसा टिकवून ठेवण्यासाठी व दोन देशामध्ये ऋणानुबंध जोडून ठेवण्यासाठी महत्वपुर्ण आहे. आपल्या देशाचे महान प्रवासी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी दक्षिण आफ्रिका मधील काळ्या-गोऱ्यांचा भेदभाव दूर सारून काळ्या लोकांना हक्क मिळवून दिले. ९ जानेवारी १९१५ साली भारतात परतले. त्याच दिनाचे औचित्य साधत निरनिराळ्या देशात स्थायिक झालेले पण मूळ भारतीय वंशाच्या लोकांमध्ये विचारांचे सूर जुळावे व आदानप्रदान व्हावे हा उदात्त हेतू ठेऊन प्रवासी भारतीय दिनाची संकल्पना लक्ष्मीमल संघवी या समितीने मांडली तेव्हापासून प्रवासी भारतीय दिन साजरे करीत आहेत.

राष्ट्रपिता महात्मा गांधी ९ जानेवारीला भारताच्या भूमीत स्वदेशी येऊन स्वातंत्र्याच्या लढ्याला दिशा, नेतृत्व दिले. सत्याग्रहाचा मार्ग अवलंबला. सत्य, अहिंसा, असहकार, सविनय कायदेभंग या मार्गाचा स्वीकार केला त्यामुळे २००३ पासून तर आजतागायत प्रवासी भारतीय दिन भारत देशात संमेलन भरवून साजरा करण्यात येतो. भारताच्या विकासात परदेशी भारतीय समुदायाच्या योगदानाची नोंद घेतल्या जाते. विविध कारणाने देशाच्या बाहेर जाऊन कार्य करणाऱ्या अनिवासी भारतीयांचे योगदान, विविध क्षेत्रातील अनुभव, नेटवर्किंगचा फायदा व्हावा त्यामुळे प्रवासी भारतीय दिनाला मूर्त स्वरूप आले. दूरदेशी भारतीय वंशाचे लोक असले तरी स्वतःच्या देशात पैसे पाठविण्याच्या बाबतीत अनिवासी भारतीय लोकांचा जगात प्रथम क्रमांक लागतो. जवळपास ११० देशामध्ये अडीच कोटी भारतीय लोक बाहेर असतात आणि आपल्या मूळ भारतीय देशामध्ये विविध देशात स्थायिक झालेल्या अनिवासी भारतीय लोकांकडून ८३.१ अब्ज डॉलर इतकी रक्कम दरवर्षी भारतात येत असते त्यामुळे विचारांचे आदानप्रदान, संस्कृती, भाषा, वारसा यात सुसंवाद घडवून आणण्यासाठी व्यासपीठ निर्माण करण्याचे कार्य या प्रवासी भारतीय दिनाने साध्य केले आहे.

प्रवासी भारतीय दिनी देशविदेशात विखुरलेले भारतीय वंशाचे नागरिक एकत्र येत असतात. प्रवासी भारतीय दिन हे आपल्या देशातच नव्हे तर दुसऱ्या देशाच्या भूमीत देखील साजरे करण्यात येते. २००३ पासून तर २०१५ पर्यंत दरवर्षी साजरे केले जात असत पण २०१५ पासून दर दोन वर्षांनी प्रवासी भारतीय दिन साजरा करण्याची प्रथा सुरू झाली. २०२२ साली १७ वा प्रवासी भारतीय दिन साजरा करण्यात आला. अनिवासी भारतीयांना प्रतिष्ठेचा प्रवासी भारतीय पुरस्कार देऊन गौरविण्यात येते.विदेशात असतांना देखील मूळ भारतीयांची संस्कृतीचा अवलंब करण्यात येतो तसेच 'आत्मनिर्भर भारत' होण्यासाठी अनिवासी भारतीय नागरिकांची देखील मदत घेणे क्रमप्राप्त आहे. इंग्लंड या देशात १० लाख अनिवासी भारतीय नागरिक आहेत. आता सध्याचे पंतप्रधान ऋषी सूनक हे देखील मूळचे भारतीय वंशाचे असल्याने भारतीयांना ही अभिमानाची बाब आहे. अमेरिकेत कमला हॅरिस या अमेरिकेच्या उपराष्ट्राध्यक्ष असल्या तरी भारतीय वंशाचे आहेत. वेगवेगळ्या देशात भारतीय देशाचा ठसा उमटविला आहे. सामाजिक, साहित्यिक, राजकीय, व्यापार,उद्योग, चित्रपट या वेगवेगळ्या क्षेत्रात आपल्या देशातील तरुण मंडळी कार्यरत असून अजूनही आपल्या देशातील मातीशी नाळ जुळवून आहेत त्यामुळे नात्यांची वीण आणखी घट्ट होण्यासाठी प्रवासी भारतीय दिनाचे संमेलनातून अनुभव कथन केल्यास येथील नागरिकांना माहिती होते म्हणून प्रवासी भारतीय दिन साजरा केल्याने एका दृष्टीक्षेपात माहिती सर्व देशवासियांना कळते ही कौतुकास्पद बाब आहे.

विदेशातील महत्वपूर्ण असलेल्या माहिती तंत्रज्ञान व कंपन्यात भारतीय वंशाचे मूळ नागरिक कार्यरत आहेत. अत्यंत बुद्धिमान, हुशार तरुण मुले रोजगाराच्या, नोकरीच्या निमित्ताने गेल्याने तिथेच स्थायिक होऊन गेले आहे पण त्यांचे नातेवाईक भारतात असल्याने ऋणानुबंध जोडले गेले आहे.तंत्रज्ञान अधिकाधिक विकसित झालेले आहे.दूरदेशी असले तरी व्हिडीओच्या माध्यमातून संपर्कात असतात.अश्या प्रवासी भारतीय दिनामुळे आपल्या मायभूमीत येण्याची संधी केंद्रसरकार मिळवून देत असल्याने त्याचा फायदा आपल्या देशाला निश्चितच होईल यात शंका नाहीच.अनिवासी भारतीय नागरिकांना देखील मतदानाचा अधिकार देण्यात यावा यासाठी निवडणूक आयोगाने केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. येत्या काळात मतदानाचा अधिकार देखील मिळणार आहे त्यामुळे विदेशात विखुरलेल्या नागरिकांना ही मोठी संधी असणार आहे. वेगवेगळ्या देशातील राहणीमान, पोशाख, संस्कृती, भाषा यांचे आदानप्रदान होण्यासाठी प्रवासी भारतीय दिनाची संकल्पना आपल्या देशातील नागरिकांच्या ज्ञानात पडणारी आहे त्यामुळे अनिवासी भारतीयांना एका माळेत गुंफण्यासाठी संमेलने भरविल्यास विचारांची आदानप्रदान झाल्याशिवाय राहणार नाही ही मात्र वस्तुस्थिती आहे.




# जैसी करनी वैसी भरनी



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**पाकिस्तान म्हंटले की जगापुढे येतो तो दहशतवाद. पाकिस्तानचे दुसरे नावच दहशतवाद आहे असे म्हंटले तरी वावगे ठरणार नाही कारण आजवर पाकिस्तानने एकच काम केले आहे ते म्हणजे दहशतवाद वाढवणे, दहशतवाद्यांना आर्थिक मदत पुरवणे, पाकव्याप्त काश्मीरमध्ये दहशतवादी तळे स्थापन करणे, त्यांना लष्करी मदत पुरवणे हेच काम पाकिस्तान आजवर करत आला आहे म्हणूनच पाकिस्तानला दहशतवादाची फॅक्टरी असे म्हटले जाते. बरं ही फॅक्टरी कोणासाठी काढली तर भारतासाठी.**

भारतासोबत समोरासमोर युद्ध झाल्यास टिकाव लागणार नाही हे माहीत असल्याने दहशतवाद पसरवून भारताला अस्थिर करण्याचा प्रयत्न केला बरे इतके करूनही पाकिस्तान भारताला अस्थिर करू शकला का ? तर नाही उलट भारत आज जगातील प्रगतशील राष्ट्र म्हणून ओळखले जाते. जग भारताकडे भावी महासत्ता म्हणून पाहते तर पाकिस्तानकडे दहशतवादी राष्ट्र म्हणून पाहत आहे. म्हणतात ना जो दुसऱ्यासाठी खड्डा खणतो तोच त्यात आधी गाडला जातो. पाकिस्तानने भारताविरोधात जो दहशतवादाचा भस्मासुर उभा केला ना आता तोच दहशतवादाचा भस्मासुर पाकिस्तानलाच भस्म करायला निघाला आहे. हो हे खरे आहे. जगासमोर दहशतवादाचे संकट उभे करणाऱ्या पाकिस्तानसमोरच आता दहशतवादाचे संकट उभे राहिले आहे. पाकिस्तानात दहशतवादी घटनांत दिवसेंदिवस वाढ होत आहे. अफगाणिस्तान सीमेवर दहशतवादी घटनांत अलीकडे खूप वाढ झाली असून ही वाढ अफगाणिस्तान सीमेवरील दहशतवाद पाकिस्तानसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे. पाकिस्तानात बंदी असलेल्या तेहरिक ए पाकिस्तान तालिबान ( TTP ) या दहशतवादी संघटनेचा यामागे हात असल्याचे बोलले जाते. या संघटनेसोबत पाकिस्तानची असलेली शस्त्रसंधी नोव्हेंबरमध्ये संपुष्टात आली तेंव्हापासून तिथे मोठया प्रमाणात दहशतवादी हल्ले वाढले आहेत. या संघटनेने नोव्हेंबरमध्ये पाकिस्तानात १०० हुन अधिक हल्ले केले आहेत तर डिसेंबरमध्ये ६० हुन अधिक हल्ले केले आहेत या हल्ल्यात दोन हजारांहून अधिक पाकिस्तानी सुरक्षा राक्षकांचा मृत्यू झाला आहे.

या संघटनेची ताकद इतकी वाढली आहे की त्यांनी थेट पाकिस्तानी सरकारलाच आव्हान दिले आहे त्यामुळे पाकिस्तानचे पंतप्रधान शहाबाज शरीफ आणि त्यांच्या सरकारचे चांगलेच धाबे दणाणले आहेत. अफगाणिस्तान सीमेवरील वजरीस्थान आणि स्वात या दोन प्रांतात त्यांनी स्वतःचे शासन स्थापन केले असून तिथे कट्टर इस्लामिक राजवट सुरू केली आहे. या संघटनेला तालिबानचा पाठिंबा असून या संघटनेमार्फतच तालिबान पाकिस्तानवर कब्जा करण्याच्या प्रयत्नात आहे. वास्तविक जेंव्हा सर्व जग तालिबानला विरोध करत होते तेंव्हा हाच पाकिस्तान तालिबानने समर्थन करत होता. अफगाणिस्तानात जेंव्हा तालिबानी राजवट सुरू झाली तेंव्हा तालिबानला मान्यता देणारा पाकिस्तान हाच पहिला देश होता. तालिबानला मान्यता देण्यामागे पाकिस्तानचा मनोदय असा होता की तालिबानला समर्थन दिल्याने तालिबान भारतात दहशतवादी हल्ले करेल पण झाले उलटेच तालिबान भारतात नव्हे तर पाकिस्तानातच दहशतवादी हल्ले करत आहे. तेहरिक ए पाकिस्तान तालिबान ही दहशतवादी संघटना पाकिस्तानचे आणखी तुकडे करतील असा कयास अनेक तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. दहशतवाद्यांच्या मदतीने भारताचे तुकडे पाहण्याची स्वप्ने पाहणाऱ्या पाकिस्तनाचेच आता तुकडे पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. भारताविरोधात वापरलेले दहशतवादाचे शस्त्र आता पाकिस्तानवरच बुमरंग झाले आहे. यालाच म्हणतात जैसी करणी वैसी भरणी.



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# बोगस शाळांचा सुळसुळाट



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**काही दिवसांपूर्वी राज्यातील तब्बल ६७४ शाळा अनधिकृत असल्याचं समोर आले होते. विशेष म्हणजे यातील सर्वाधिक २२३ शाळा मुंबईमधल्या होत्या आता परत एकदा बोगस शाळांचे प्रकरण चव्हाट्यावर आल्याने संपुर्ण शिक्षण क्षेत्र हादरून गेलं आहे. पुणे हे शिक्षणाचे माहेर घर समजले जाते. अनेक शाळा संस्था पुण्यात आहेत. यात सीबीएसई शाळा देखील आहेत. या शाळांना राज्य शासनाची मान्यता घेणे गरजेचे असते. त्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) दिली जाते. हे बोगस प्रमाणपत्र देणारी टोळी पुण्यात कार्यरत झाली होती. तब्बल १२ लाख रुपयात हे प्रमाणपत्र शाळा घेत होते. या साठी मंत्रालयातील शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांच्या बनावट सह्यांचा वापर करण्यात आला आहे.**

शिक्षण विभागाला याची कुणकुण लागल्यानंतर त्यांनी या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले. पुणे जिल्हा परिषदेमार्फत या प्रकरणाची चौकशी सूरु आहे. तब्बल तीन शाळांची चौकशी सुरू आहे. हा घोटाळा मोठा असून यात अनेक मोठ्या माशांचा हात असल्याचे बोलले जात आहे. सध्या या प्रकरणी राज्य शिक्षण मंडळाच्या शाळांचा यात समावेश आहे. पुण्यातील एम. पी. इंटरन्याशनल स्कुल एन्ड ज्युनियर कॉलेज, शिवाजीनगर , क्रिएटिव्ह एज्युकेशन पब्लिक स्कुल एन्ड ज्युनियर कॉलेज आणि नमो आर आय एम एस इंटरन्याशनल स्कुल एन्ड ज्युनियर कॉलेज या शाळांची चौकशी सध्या सुरु आहे. सीबीएसई शाळांना राज्य शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे लागते. शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या मार्फत हे पत्र मिळत असते. हे बनावट प्रमाणपत्र तयार करून देणारी टोळी कार्यरत असल्याचे उघड झाले आहे. शाळांचा इनवर्ड नंबर घेऊन त्याआधारे बनावट प्रमाणपत्र तयार करण्यात आले आहे. मंत्रालयातील संबंधित अधिकाऱ्यांच्या बनावट सह्या करण्यात आल्या असून हे प्रमाण पत्र देण्यात आले आहे. या पत्रासाठी तब्बल १२ लाख रुपये घेण्यात आल्याचे पुढे आले आहे.

विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाने जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाला सीबीएसई शाळांच्या बनावट न हरकरत प्रमाणपत्र चौकशीचे आदेश दिले होते. त्यानुसार या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे. तब्बल १० ते १३ शाळांनी हे बोगस प्रमाणपत्र घेतले असल्याचे पुढे आले असल्याचे चौकशी अधिकारी के. डी. भुजबळ यांनी सांगितले आहे.

ज्या शिक्षण संस्थांच्या नावे सीबीएसइची बोगस प्रमाणपत्रे तयार केल्याचा आरोप आहे, त्या शिक्षण संस्थांनी मात्र हात वर केलेत. आपल्या संस्थेच्या नावे सी बी एस इ चे बोगस प्रमाणपत्र कसे तयार झाले, हे आपल्याला ठाऊक नाही असं एम . पी . इंटरनॅशन स्कुल एन्ड ज्युनियर कॉलेजच्या मुख्याध्यापकांच म्हणणं आहे. अशी बनावट प्रमाणपत्रं तयार करून देण्यासाठी तब्ब्ल बारा लाख रुपये घेण्यात आल्याची माहितीय. अर्थात अशी बनावट प्रमाणपत्र तयार करून देणाऱ्या टोळीमध्ये काही संस्थचालक आणि शिक्षण विभागातील काही अधिकारी देखील



सहभागी असण्याची शक्यताय आहे. आणि म्हणूनच या प्रकरणाच्या चौकशीचे मंत्रायलयातून आदेश सुटलेत.

सध्या या प्रकरणाची चौकशी शिक्षण अधिकारी करतायत. पण या गुन्ह्यांचं स्वरूप गंभीर आहे आणि व्यप्ती मोठी आहे. त्यामुळे या प्रकरणाचा तडा लावायचा असेल तर या प्रकरणाची पोलीस यंत्रणेमार्फत निष्पक्ष चौकशी होण्याची गरज आहे.

बोगस शाळा उघडुन संस्थाचालक विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ खेळत आहे उद्योजक, व्यापारी, राजकीय पुढारी, व्यावसायिक यांनी प्रामुख्याने शाळा उभारल्या आहेत. यातही इंग्रजी माध्यमांच्या विशेषतः सी बी एस सी च्या शाळा उभारण्याला सर्वाधिक प्राधान्य देण्यात आले. या शाळा विद्यार्थ्यांकडून भरमसाठ शुल्क वसूल करत असतात. या शाळांबाबत शिक्षणाधिकाऱ्यांकडे अनेकदा तक्रारी केल्या जातात. मात्र, प्रत्यक्षात शाळांवर कठोर कारवाई होत नसल्याचे निदर्शनास येत आहे. या शाळांपैकी किती शाळांना शासनाने परवानगी दिली आहे याची खात्री करावी लागणार आहे. पण झालेल्या नुकसानीला कोण जबाबदार? बोगस शाळांचे प्रकरण या आधी देखिल समोर आले होते. मात्र या संपुर्ण प्रकारात मोठ मोठे राजकारणी व अधिकाऱ्यांचे हितसंबंध गुंतले असल्याने थातुर मातुर चौकशी झाली.

बोगस मान्यता आदेश तयार करण्यात मंत्रालयातील काही अधिकारी व कर्मचारी सहभागी असल्याने यामध्ये करोडो रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे. त्यामुळे याप्रकरणाची एसआयटीमार्फत चौकशी करून दोषी विरुद्ध कठोर कार्यवाही करण्याची गरज आहे.

# तीळगुळाची गोडी फेसबुक, व्हॉटसअपवर ? संवादाची नाती फिकी पडली



राम कुलकर्णी,
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**मकर संक्रांत भारतीय हिंदु संस्कृतीमध्ये पिढ्यान पिढ्यापासुन चालत आलेला उत्सव आहे. अर्थात या उत्सवाला अध्यात्मिक आणि धार्मिक आधार वेगवेगळे असले तरी हा उत्सव महिलांचा म्हणुन ओळखल्या जातो. तीळगुळ घ्या अन् गोड गोड बोला दोन मनाचं संक्रमण आणि त्यातुन नात्याची जडणघडण यासाठी पण उत्सव महत्वाचा आहे. एक महिना उत्सव चालतो. हिवाळा संपतो आणि उन्हाळ्याच्या तोंडावर उत्सव असतो. अर्थात मकर संक्रांत झाली म्हणजे उन्हाळा सुरू झाला असाही अर्थ असतो. महिलांच्यासाठी वीस दिवस हळदी-कुंकु असते. काळा रंग एरवी अशुभ म्हणुन ओळखला जातो. मात्र मकर संक्रांतीला शुभ मानला जातो. म्हणुन महिलांची साडी नाही म्हटलं तरी काळ्या रंगाची असते. गाठीभेटी घेत तीळगुळ एकमेकांना द्यायचे प्रत्यक्ष संवाद करायचा आणि ऋणानुबंध वाढवायचा असं एकुण स्वरूप मानवी समाजात उत्सवाचं आहे.**


मात्र अलीकडे एकुण्ाच व्यवस्थेला परिवर्तन मोठ्या प्रमाणावर झालेलं दिसत आहे. सद्य स्थितीत तिळगुळाची गोडी फेसबुक, व्हॉटसअपवर आली आणि प्रत्यक्ष संवादाची नाती तुटली. कारण आज बसल्या ठिकाणी आपण शेकडो लोकांना व्हॉटसअपवर तिळगुड देतो.मात्र प्रत्यक्ष गाठीभेटी जावुन सोपस्कार पाडणे नको वाटते. आधुनिक तंत्रज्ञानातला बदल एकमेकांपासुन माणसं तोडण्याला कारणीभुत ठरतो की काय?अशी भिती पुढे येत आहे. नाही म्हटलं तरी आज पंच्याहत्तर टक्के तीळगुळ मोबाईलवर मिळतात ज्यामुळे प्रत्यक्ष संवाद होत नाहीत आणि माणसाचे मनं एकमेकाला कळत नाहीत. हे सामाजिक चित्र भविष्यात फार चांगलं आहे असंही म्हणता येणार नाही.

भारतीय संस्कृती सामाजिक परिवर्तनासाठी आणि रूढी परंपरा जपताना वर्षानुवर्षे ऋणानुबंध टिकवुन ठेवण्यासाठी प्रभावशाली म्हणुन ओळखल्या जाते. हिंदु रितीरिवाजामध्ये वेगवेगळे धार्मिक उत्सव वर्षभर चालत असतात आणि तेही कधी पुरूषांचा उत्सव तर कधी महिलांचा उत्सव, महालक्ष्मी, मकर संक्रांत, पंचमी म्हटलं की महिलांचा उत्सव म्हणुन ओळखल्या जातो.बैल-पोळा शेतकऱ्यांचा उत्सव म्हणुन तर दिवाळी उत्सव हा बहिण-भावासाठी म्हणुन ओळखला जातो. विजया दशमी स्वतंत्र पुरूष यांच्यासाठी उत्सव आहे. अर्थात ऋतुमानाप्रमाणे उत्सवाची निर्मिती हिंदु समाजात करण्यात आली. त्यामागे धर्मशास्त्र आणि त्याचे अर्थ अनेक आहेत. मकर संक्रांत थंडीच्या दिवसात का?तर कदाचित तिळासारखे स्निग्ध पदार्थ जास्त खाण्यात यावेत ज्यातुन शारीरिक सदृढता वाढते. हा दृष्टीकोन ईश्वर निर्मित परंपरेनुसार चालत आलेला आहे. अलीकडच्या काळात उत्सवाचं स्वरूप बदलत आहे. पुर्वी मकर संक्रांत म्हटलं की, तीळगुळाचे पुडे खिशाच्या पाकिटात ठेवायचे आणि एकमेकांना प्रत्यक्ष भेटुन तीळगुळ द्यायचे. वयाने छोटी माणसं मोठ्यांना तीळगुळ देतात आणि त्यांचा आशिर्वाद घेतात. मग त्यासाठी शिष्यानं गुरूच्या घरी जायचं किंवा नातेवाईकांचे आशिर्वाद घेण्यासाठी जायचं. तिथे संवाद आणि चर्चा. मनाचा एकोपा आणि ऋणानुबंध निर्माण होण्यासाठी हे निमित्त फारच चांगलं असायचं. मकर संक्रांत महिलांचा सण म्हणुन ओळखला जात असला तरी तिळगुळ एकमेकांना आदानप्रदान करून नात्याची गोडी वाढवणे हा पण उद्देश असायचा. मकर संक्रांतीच्या दिवशी विठ्ठल-रूक्माईच्या मंदिरात मोठ्या प्रमाणावर महिलांचं एकत्रीकरण आणि मग तिथुन पुढे किती तरी दिवस उत्सवाचा थाटमाट सुरू असतो. आजही महिला मोठ्या प्रमाणावर एकमेकांच्या घरी हळदी-कुंकु घेण्यासाठी जात्ाात. ज्याला आवा लुटणं घेणे आणि देणं असं म्हणतो आणि पुरूष एकमेकांना तीळगुळ देतात. कालपरत्वे प्रत्येक सण उत्सवात परिवर्तन झालेलं आहे. आज डिजिटल जमान्यात वाण देण्यासाठी वेगवेगळ्या वस्तु पण स्वरूप तेच. मात्र आजची सामाजिक घडी आणि माणसाची मने पुर्वीसारखी स्वच्छ राहिली अशी नव्हे. जुन्या काळात मनाचं संक्रमण ऋणानुबंध वाढवणारं असायचं. ज्यातुन विश्वास आणि आपुलकी निर्माण व्हायची व नाती टिकायची. आज तसं नाही. कारण प्रत्येक माणुस स्वतःसाठी जगतो. परोपकारी भावना कमी झाली असुन एकलेपणा हे मानवाचं वैशिष्ट्य पुढे आलं आहे. आज मोबाईल क्रांती व समाजात झालेलं परिवर्तन वाऱ्याच्या वेगासारखं आहे. कारण बदलत्या युगात माणुसकीचा विसर लोकांना पडला आहे. त्याहुन अधिक प्रत्यक्ष संवाद आणि गाठीभेटी यातही जास्त रस राहिला नाही. कारण फेसबुक, व्हॉटसअप, सोशल मिडिया याच्या अधिन समाज जास्त जाताना दिसतो आहे. आजही केवळ मकर संक्रांत नव्हे तर महापुरूषांच्या जयंत्या किंवा इतर उत्सव डिजिटल होवुन बसले आहेत. शेजारी राहणारे माणसं एक एक महिना भेटत नाहीत. संवाद करत नाहीत. त्याचं कारण पहाटे उठल्याबरोबर मोबाईलचं ठोकडं हातात येतं, गुडमॉर्निंग किंवा चहाचा कप टाकुन नमस्कार घातल्या जातो. एकमेकांना घरी बोलावणे, सोबत नाश्ता करणे, जेवणावळी, आदानप्रदान या गोष्टी आता इतिहासजमा होत आहेत. तीळगुळाची गोडी फेसबुक, व्हॉटसअपवर आली म्हणुन संवादाची प्रत्यक्ष नाती तुटली. आज लोकांना खिश्यात तिळगुळ ठेवणे म्हणजे कुठे तरी मेट्रो प्रोफाईल जीवनात वेगळेपणा वाटतो अशी मानसिकता होत आहे. पण खरा आनंद प्रत्यक्ष भेटीत मिळतो. तो फेसबुक, व्हॉटसअपवर मिळु शकत नाही हे तितकंच खरं. पण माणुस स्वामीनिष्ठ झाला ज्यातुन एकटेपणाच्या आहारी जात आहे. संक्रांत कुणावर बसणार? याची वाट पाहणारे डोळे जास्त वाढले आहेत. प्रत्यक्ष संवाद करण्यासाठी गाठीभेटी नको वाटतात. नव्या पिढीतील मुलं एकमेकांच्या नातेवाईकांकडे जाताना दिसत नाहीत.



वाढदिवस ज्याप्रमाणे फेसबुक, व्हॉटसअपवर आले त्याचप्रमाणे तीळगुळाचे झाले. दुसरीकडे महिलांचं आजही बरं आहे. नाही म्हटलं तरी बऱ्यापैकी महिला वर्ग हळदी-कुंकवाच्या निमित्ताने आजही संवाद करतात आणि त्यातुन ऋणानुबंध चांगला वाढतो. याउलट हळदी-कुंकाचे स्वरूप खर्चीक झाले असले तरी वाणामध्ये वेगवेगळ्या नाविन्यपुर्ण वस्तु आणल्या जातात.

पुरूष मात्र प्रत्यक्ष तीळगुळ हातावर ठेवताना कमी दिसतात. कारण मोबाईलचं ठोकडं हातात घेवुन बसल्या ठिकाणी यादीतुन तीळगुळ पाठवतात. ज्यामुळं स्नेहाची गोडी फार टिकेलच असे नव्हे. नवीन पिढीतल्या युवकांनी उद्याच्या मकर संक्रांतीनिमित्त मोबाईलवर तीळगुळ न देता नातेवाईक, मित्र, गुरू यांची प्रत्यक्ष भेट घेवुन तीळगुळाची व संवाद करण्याची प्रतिज्ञा खऱ्या अर्थाने करायला हवी. कारण फेसबुक, व्हॉटसअप यातुन निर्माण होणारी नाती फार टिकतील असे नव्हे. दोन जीव एकत्र येतात.पण काही दिवसात घटस्फोट होतात. अशा अनेक घटना आपण पाहतो. त्याप्रमाणे मनाचं मिलन ऱ्हदयातुन व्हायचं असेल तर तीळगुळ प्रत्यक्ष हातावर द्या आणि घ्या. बघा अनुभव आणि आपले नाते कसे टिकुन रहाते ते? डिजिटल जमान्यात मोबाईलच्या आहारी जाणं भावी पिढीसाठी फार चांगलं आहे असंही नव्हे. उद्या प्रेमाचा नमस्कार हात जोडणारं चित्र पाठवुन केला जातो. काही दिवसात दोन पाय असलेलं चित्र आणि मग तोच आशिर्वाद दर्शन स्वरूपाने निघालं तर आश्चर्य वाटायला नको. चला तर बघु उद्याच्या मकर संक्रांतीत तीळगुळ देवु आणि गोड गोड बोलु.



# गोड गळ्याचे गायक; येसुदास

आधुनिक केसरी

आज १० जानेवारी हिंदी चित्रपट सृष्टीतील ख्यातनाम गायक आणि संगीतकार येसुदास यांची ८३ वाढदिवस. हिंदी चित्रपट सृष्टीत ज्या गायकांनी आपल्या मधुर आवाजाने ठसा उमटवला त्यात येसुदास हे एक महत्वाचे नाव. १० जानेवारी १९४० रोजी एका मल्याळम ख्रिश्चन कुटुंबात जन्मलेल्या येसुदास यांचे वडील मल्याळम भाषेतील शास्त्रीय संगीतकार होते. त्यांच्या वडिलांकडूनच त्यांनी संगीतकलेचे प्राथमिक धडे गिरवले. वयाच्या सातव्या वर्षी कोची येथील स्थानिक स्पर्धेत भाग घेऊन त्यांनी सुवर्णपदक जिंकले. कन्नड, मल्याळम, तेलगू आणि तामिळ या दक्षिण भारतातील सर्व भाषेत त्यांनी गाणी गायली तिथे त्यांनी गायलेली सर्वच गाणी हिट झाली. त्यांच्या आवाजाची परदेशातील रसिकांना देखील भुरळ पडली. १९६५ साली रशियन सरकारने त्यांना गाण्यासाठी खास आमंत्रण दिले होते. गोड, मखमली आवाज ही येसुदास यांची ओळख बनली. त्यांच्या गोड आणि मखमली आवाजाची कीर्ती हिंदी चित्रपट सृष्टी पर्यंत पोहचली नसती तरच नवल. संगीतकार सलील चौधरी यांनी त्यांना दिग्दर्शक बासू चॅटर्जी यांच्या छोटीशी बात या चित्रपटात साठी एक गाणे गायला लावले. त्यांच्या आवाजाने बासू चॅटर्जी हे ही प्रभावित झाले त्यांनी त्यांना त्यांच्यव चित्रपटात गाण्याची ऑफर दिली. १९७० सालापासून त्यांनी हिंदी गाणी गायला सुरवात केली. जानेमन जानेमन तेरे दो नयन या गाण्यानंतर शांत सज्जन दिसणारा अमोल पालेकर यांच्यासाठी येसुदास यांचाच आवाज सूट होतो असा असे गणित बॉलिवूडने बांधले. येसुदास यांच्या मधुर आवाजामुळे अनेक संगीतकार त्यांना त्यांच्यासाठी गाण्याची गळ घालू लागले मात्र येसुदास हे गाण्याची निवड मात्र विचारपूर्वक करत. येसुदास यांनी फक्त अमोल पालेकर यांच्यासाठीच नाही तर अमिताभ बच्चन आणि जितेंद्र यांच्यासाठीही गाणी गायली. त्यांनी रवींद्र जैन, बप्पी लाहिरी, खय्याम, राजकमल, सलील चौधरी या संगीतकारांसमवेत अनेक सदाबहार हिंदी चित्रपटातील गाणी गायली. त्यांनी जवळपास ४५००० गाणी गायली आहेत. सध्याच्या पद्धतीची गाणी त्यांना आवडत नाहीत म्हणून त्यांनी बऱ्याच वर्षांपासून गाणे गायचे थांबवले आहे. येसुदास यांना अनेक पुरस्कारही मिळाले आहेत. भारत सरकारने त्यांना २००२ सालीं पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार दिला आहे तर केरळ सरकारने त्यांना त्यांच्या संगीत क्षेत्रातील सर्वोत्तम स्वाती पुरस्कारम या पुरस्काराने गौरविले आहे. त्यांना राष्ट्रीय पुरस्कार देखील मिळाले आहेत. येसुदास यांनी काही दाक्षिणात्य भाषेतील चित्रपटांची निर्मितीही केली आहे. येसुदास यांनी गायलेली गोरी तेरा गाव बडा प्यारा, सुरमई अखियों मे, दिल के तुकडे तुकडे करके, जानेमन जानेमन तेरे दो नयन, चांद जैसे मुखडे पे ही गाणी आजही लोकप्रिय आहेत. येसुदास यांचे चाहते केवळ भारतातच आहेत असे नव्हे जगभर त्यांचे चाहते आहेत. गोड आणि मखमली आवाजाचे गायक येसुदास यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

# आजचा दिशाहीन भारतीय युवक

सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

आधुनिक केसरी

**देशाला स्वातंत्र्य मिळून आज ७५ वर्षे होवून गेली असताना या कालावधीत आज आपल्या देशाने जो विकास साधला आहे त्यात खरे योगदान कोणाचे आहे हा प्रश्न पडणे साहजिकच आहे. राजकारणी नेते, प्रशासनातील कर्मचारी, शिक्षक, मजूर, वरिष्ठ नागरिक की आणखीन कोण ? नक्कीच यापैकी कोणीच नाही. देशाच्या विकासात सिंहाचा वाटा हा वर उल्लेख नसलेल्या देशातील तरूण वर्गाचा आहे. कोणत्याही देशाची खरी संपत्ती व बलस्थान हे त्या देशातील युवक आहेत. देशातील युवकांच्या दर्जावरून त्या देशाचे भवितव्य कसे असेल हे ठरत असते.**

सुदैवाने लोकसंख्येच्या दृष्टीने जगात दुस-या क्रमांकावर असलेल्या या आपल्या देशात एकूण लोकसंख्येच्या २० टक्के बालक, २० टक्के वृद्ध व ६० टक्के लोकसंख्या युवक वर्गाची म्हणजेच २४ ते ४० वर्षे वयोगटाची आहे, म्हणूनच भारताला तरूणांचा देश असे संबोधले जाते. हा युवक वर्ग नेहमीच शारीरिक, मानसिक, आर्थिक व सामाजिक रूपाने सदैव सक्रीय असतो आणि असायलाही हवा. देशाच्या विकासात महत्वाचे योगदान असणा-या या युवक वर्गाची आजची स्थिती मात्र खूप चिंताजनक आहे. भारतीय युवकांची स्थिती चिंताजनक आहे असे म्हटल्यावर याचे देशावर काय परिणाम होतील हे वेगळे सांगायला नको. भारतात बेरोजगारीचे प्रमाण मोठे असल्याने आजचा हा युवक बेरोजगार तर आहेच सोबत हाताला काम नसल्याने दारू, अफू, चरस, गांजा या सारख्या व्यसनांच्या आहारी गेलेला, व्हाटसॲप, फेसबुक सारख्या सोशल मीडिया वर आपला जास्तीत जास्त वेळ घालवणारा, बेजबाबदार, गुन्हेगारी प्रवृती व दहशतवादाकडे वळलेला दिसून येतो. युवकांच्या या स्थितीला फक्त युवकच जबाबदार आहे, असे म्हणून आपल्याला आपले हात झटकून मोकळे होता येणार नाही. आजची युवक पिढी एवढी मनमानी करणारी व बेजबाबदार का आहे ? याचा आपण कधी विचार केला आहे का ? त्यांच्या भाव-भावनांना कधी समजून घेतले आहे का ? स्पष्टपणे म्हटलं तर नाही. आजचे युवक भरकटलेले आहेत असे म्हणण्याचा अधिकार आपल्याला बिलकुलच नाही. दुस-याकंडे बोट दाखवणा-यांनी स्वतःकडे उठणा-या चार बोटांकडेही बघितले पाहिजे. युवकांना नावे ठेवणा-या या पिढीने त्यांच्यासमोर नेमका कोणता आदर्श निर्माण केलाय याचे आत्मपरिक्षण करणे गरचे आहे. अनियंत्रित

लोकसंख्या वाढीने अनेक समस्या निर्माण करणा-या या पिढीने युवक पिढीबद्दल फक्त चिंता व्यक्त करून चालणार नाही. जेंव्हा आपण भारतीय वर्तमानकालीन युवकांच्या स्थितीबद्दल भळभळून बोलतो, त्यांच्या भविष्याबद्दल चिंता व्यक्त करतो तेंव्हा आपण भूतकाळात डोकावून बघितले पाहिजे. स्वातंत्र्यपूर्व काळात भगत सिंह, सुखदेव, राजगुरू, चंद्रशेखर आजाद हे युवक त्याकाळच्या युवकांचे प्रेरणास्थान होते. ज्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी

आपल्या सर्वस्वाचा त्याग केला, प्रसंगी प्राणाचे बलिदान दिले. या युवकांकडे पाहूनच समकालिन युवकांच्या रक्तात एक वेगळा उत्साह संचारत होता. हे युवक या तरूणांना आपला आदर्श मानीत असत. भूतकाळ जेवढा खराब तसा वर्तमान त्याची सावली



आणि भविष्य तर आणखीनच खराब. ऐकायला-वाचायला या गोष्टी निश्चीतच निराशाजनक वाटतील, पण जर थंड डोक्याने विचार केला, स्वतःलाच जर प्रश्न विचारला की, आजच्या या तरूण पिढीला मागच्या पिढीने काय वारसा दिलाय ? कसले संस्कार आणि कसला समाज दिलाय ? तर युवकांच्या आजच्या अवस्थेचे उत्तर आपल्याला निश्चित मिळेल. मी भूतकाळा बद्दल बोलतोय म्हणजे स्वातंत्र्यपूर्व कालाबद्दल नाही तर स्वातंत्र्योत्तर कालाबद्दल गेल्या ७५ वर्षांबद्दल बोलतोय. काय बघितलं आपण या ७५ वर्षात ? वाढत चाललेली गुन्हेगारी, राजकारणाचे गुन्हेगारीकरण किंवा असेही म्हणता येईल की गुन्हेगारांचे राजकीकरण, वाढत चाललेला भ्रष्टाचार, वाधता जातीयवाद आणि बेरोजगारी. जेवढं वाईट करता येईल ते मागच्या पिढीने केलं. अर्थात सगळ्याच गोष्टी वाईटच झाल्या असं नाही. प्रत्येक समाजात वाईट गोष्टींसोबत चांगल्याही गोष्टी होत असतातच. मात्र भूतकाळात वाईट गोष्टींनाच जास्त प्राधान्य दिलं

गेलं हे सत्य आहे. जर असा समाज युवकांच्या पूढे आदर्श म्हणून असेल तर आजच्या या युवक पिढीला दोष देवून काय उपयोग ? भारतीय युवक नवक्रांती करायला तयार आहे, मात्र त्याला कोणीतरी रोखू पाहतयं ते म्हणजे राजकीय क्षेत्र आणि त्यातील भ्रष्ट राजकारणी. राजकारणात आता देशप्रेमाची जागा घराणेशाही, जातीयवाद, सत्तेच्या हव्यासाने घेतली आहे. राजकीय क्षेत्रावर फक्त वयस्कर लोकांचाच बोलबाला आहे आणि फक्त बोटावर मोजण्याईतकेच युवक आहेत. राजकीय क्षेत्राचे वातावरण दिवसेंदिवस गढुळ होत चालले आहे. भारताच्या राजकारणात आता असे युवक नेते नाहीत जे युवक वर्गात नवा उत्साह भरतील. राजीव गांधी सारख्या युवा नेतृत्वाने देशाच्या विचारात एक नवा उत्साह निर्माण करण्याचे काम केले. त्याच्या फलस्वरूप देशाने प्रगतीचे शिखर गाठले. मात्र या युवा नेत्याच्या अकाली निधनाने देश पूढे हवा तसा प्रगती करू शकला नाही. देशातील

युवक गलीच्छ राजकारणाचे बळी पडत गेले आहेत आणि आजही पडत आहेत. हुशार राजकारणी या युवकांचा निवडणूकीच्या कामासाठी तात्पुरता वापर करतात आणि निवडणूक संपताच त्यांना वा-यावर सोडतात. बरीच नेते मंडळी केवळ आपल्या सोईसाठी युवकांचे पालनपोषण करतात. त्यांना आळशी बनवितात. त्यामुळे युवकांनी आता जागे होवून प्रस्थापित राजकिय नेते मंडळींच्या मागे न धावता स्वतः सक्रीय राजकारणात उडी घेण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्या शिवाय देशाची प्रगती अशक्य आहे. आज भारतीय नेतृत्व युवक वर्गाला योग्य संधी देण्यात अपयशी ठरले आहे. तो बेरोजगारीची मार खातो आहे. हाताला काम नसल्याने केवळ सोशल मीडियाच्या आभासी जगात जगत निराशेच्या गर्तेत ढकलला जात आहे. थोर महापुरुषांनी समाजहितासाठी, धर्महितासाठी आपले जीवन व्यतीत केले आहे. आजचा युवक हा आजच्या आधुनिक जगातील नागरिक आहे. तो सुदृढ, सशक्त, प्रगल्भ व सुविचाक्षम आहे. आजघडीला देशातील युवकांनी सोशल मीडियाच्या नादी न लागता महापुरूषांचे जीवनचरीत्र अभ्यासायला हवे व त्यामधून आपल्या हस्ते समाजहित, धर्महित तथा राष्ट्रहित हे कसे साधले जावू शकते, याचाही विचार करायला हवा आणि त्या अनुषंगाने कार्यतत्पर व्हायला हवे. फक्त युवकांनी बुद्धीजीवी लोकांच्या संपर्कात राहून बुद्धीजीवी बनायचे की बुद्धीवाद्यांच्या संपर्कात राहून बुद्धीचातुर्याने समाजमनावर अधिराज्य गाजवायचे हे मात्र, युवकांच्या हाती आहे. आज विद्यापिठातून पदव्यांची भेंडोळी घेऊन बाहेर पडणारा युवक नोकरीसाठी भटकत आहे. आज भारतात कामाचा योग्य मोबदला मिळत नाही म्हणून परदेशात जाणा-या युवकांची संख्या जास्त आहे. ते भारतात तेंव्हाच परततील जेंव्हा त्यांना येथे योग्य संधी उपलब्ध होतील. त्यांना रोखण्याचे मार्ग आपण शोधले पाहिजेत. आज सुदैवाने देशाला नरेंद्र मोदींसारखे हुशार पंतप्रधान लाभले आहेत. त्यामुळे जगाचा भारताकडे पाहण्याचा दृष्टीकोण सुद्धा बदलला आहे. मेक इन इंडिया सारखे उपक्रम देशात सुरू झाले आहेत. आज देशाला

हुशार, उद्योगी आणि कर्तबगार युवकांची खरी गरज आहे. देशातील युवकांनी नोकरीच्या मागे न लागता उद्योजक बनण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

युवा पिढी म्हणजे नव्या विचारांची आणि आधुनिकतेची सांगड घालून आपलं म्हणणं समाजापूढे मांडणारी नव्या जोशाची पिढी. या युवकांचा उत्साह, त्यांची सर्जनशिलता, अष्टपैलुत्व आश्चर्यकारक आहे. त्यांना अधिक सक्षम बनवणे गरजेचे आहे. आजचा तरूणच देशाची उद्याची दशा आणि दिशा ठरवणार आहे. आजच्या तरूणांना गरज आहे ती योग्य मार्गदर्शनाची आणि कुशल नेतृत्वाची. देशाची बांधणी हे युवकच करतात आणि करतीलही. जर युवक शक्तीचा योग्य वापर केला नाही तर चुकीचा वापर होवु शकतो. आपल्याला देशातील, खेड्यापाड्यातील युवकांवर भर द्यावा लागेल. देशाची मोठी ताकद असलेल्या युवक पिढीला जर असेच प्रभावहीन, नेतृत्वहीन व दिशाहीन ठेवले तर उद्याचे चित्र आजच्या पेक्षा भयावह असणार आहे.

# बदलत्या गावकुसाचे अस्वस्थ वर्तमान सांगणारी कादंबरी : हराकी


आधुनिक केसरी

**संवेदनशिल लेखक म्हणून ओळख असणारे मनोहर भोसले यांची 'हराकी' ही कांदबरी प्रकाशित झाली आहे. या ग्रामिण कादंबरीच्या नावातच कादंबरीचा विषय दडलेला आहे. 'हराकी' हा अंत्यसंस्काराच्या वेळी केला जाणारा एक विधी आहे. मृतात्म्याच्या आत्म्याला शांती मिळावी म्हणून केल्या जाणाऱ्या 'हराकी' या अंत्यसंस्काराच्या विधीला सामाजिकदृष्ट्या महत्व आहे. या विधिशिवाय कुठल्याही मयताचा अंत्यविधी पूर्ण होत नाही. असे असले तरी हराकी हा विधी पूर्ण करणारा, हराकी म्हणणारा या कादंबरीचा नायक मात्र उपेक्षित जिवणाचा कर्णधार म्हणून जगताना आपल्याला या कादंबरीतून वाचायला मिळतो.**

गावातील प्रत्येक मयताला 'हराकी' म्हणणारा या कादंबरीचा नायक 'यमणाप्पा' मयताच्या प्रेतावर ओतायसाठी आणलेल्या रॉकेलमधून उरलेले रॉकेल आपल्या घरच्या गरीबीमुळे घरी घेऊन जातो. त्यावर कित्येक दिवस त्याचा मुलगा अभ्यास करतो. मुलाने अभ्यास करताना रॉकेल संपवू नये म्हणून मुलाचा अभ्यास होईपर्यंत रात्र जागणारा यमणाप्पा, घरात अठराविश्व दारीद्र्य असूनही दुसऱ्याच्या शेतातील मालाला हात लावायचा नाही अशी बायकोला ताकीद देणारा कादंबरीचा नायक कादंबरी वाचताना प्रामाणिक, स्वकष्टाने कुणाच्या उपकाराचे ओझे न वाहता, साध्या सरळ मार्गाने जाणारा यमणाप्पा मनाला भावतो. वंश परंपरेने चालत आलेला 'हराकी' हा विधी तो पूर्ण श्रद्धेने करत असतो. हे काम करताना तो मयताच्या कुटुंबाकडून कुठल्याही आर्थिक लाभाची अपेक्षा करत नाही. तरीही लोकांकडून त्याची होणारी उपेक्षा, त्याची केली जाणारी चेष्टा, समाजात त्याला दिली जाणारी दुय्यम वागणूक वेदनादायी आहे.

गावकुसात अनेक चालीरीती पूर्वापार चालत आलेल्या आहेत. या चालीरीती सुरू करण्यामागे किंवा या चालीरीती पाळण्यामागे पूर्वीच्या लोकांचा दृष्टिकोण हा गावगाडा नीट चालण्याच्या दृष्टिने समाज एक कुटुंबासारखं राहावं, त्यांच्यात सलोखा राहावा, सुख, समाधान, शांती मिळावी हा होता. परंतू काळ बदलला तसा या पूर्वापार चालत आलेल्या चालीरीतींमध्ये लोकं सोईनुसार बदल करू लागले. थोर पुरूषांच्या जयंत्यांच्या मिरवणूकांमध्ये डिजेच्या तालावर नाचणारी तरूणाई बघितली की याची प्रचिती येते. पूर्वापार चालत आलेल्या परंपरांमागची कारणं समजून न घेतल्याने यामागचा मूळ उद्देश बाजूला पडून चंगळवाद फोफावत चालल्याची जाणीव ही कादंबरी करून देते. यमणाप्पाच्या गावात सतीप्रथे विरोधात एल्गार पुकारणाऱ्या दोन धाडसी बायांच्या समाध्या आहेत. त्याला घुमट असे संबोधले जाते. या समाधीला लग्न जुळलेल्या मुली नैवद्य दाखवतात. परंतु आजकालच्या मुली या प्रथेला अंधश्रद्धा समजून साधं पायाही पडत नसल्याची खंत यमणाप्पा उपसरपंचाच्या बायको आणि पोरीला बोलून दाखवतो.

यमणाप्पा हा माणूस प्रत्येकाच्या मदतीला धाऊन जातो, गावात मयत झाल्यास मयताची बातमी पाहुण्यांना देतो, गावातील लग्नकार्यात सर्वप्रकारची कामे तो करतो, नवऱ्यामुलासोबत मुलगी बघायला जातो, गावात साजऱ्या होणाऱ्या प्रत्येक सण उत्सवात तो सर्वात पुढे असतो. अशा यमणाप्पाला जेव्हा गावातील काही लोकं, 'तू दुसऱ्याच्या जिवावर जगतूईस.' असं बोल लावतात तेव्हा त्याला खूप वाईट वाटतं. गावभरची हलकी कामे करत असल्याने त्याला लाचार म्हणणे हे गावाच्या बदलत्या मानसिकतेचे आणि बदलत्या वातावरणाचे लक्षण असल्याचे त्याला वाटते. माणसाचा माणसाबद्दल वाढत चाललेला द्वेश तो याची देही याची डोळा अनुभवतो.




काळ बदलत चाललाय तसा गावगाडा बदलत चाललाय. पोरं आईबाबाला घराबाहेर काढतायत, भाऊ भावाचा वैरी झालाय. गावात चांगल्या माणसांची संख्या रोजचेरोज कमी होत चालली आहे. यमणाप्पा अडाणी असला तरी बऱ्या वाईटाची त्याला चांगलीच जाण आहे. गावातील लोकांचे स्वार्थी वागणे त्याला रूचत नाही. ओठात एक आणि पोटात एक असल्या प्रवृत्तीची माणसं तो ओळखून आहे. गाव नको त्या वाटेनं चाललाय याची जाणीव त्याला पावलोपावली होत असते. गावाचं गावपण हरवून जावू नये असं यमणाप्पाला सारखं वाटत असतं. परंतू जिथे प्रतिष्ठित पंचांना किंमत नाही तिथं बिचाऱ्या यमणाप्पाला कोण दाद देणार ?

श्रीयाळ षष्टीच्या कार्यक्रमात होणारी हुल्लडबाजी, धक्काबुक्की यमणाप्पाच्या मनाला वेदना देते. कुठलीही प्रथा मानली तर चांगली नाहीतर अंधश्रद्धा म्हणून बंद पडतात. साऱ्या गावाची खबर राखणाऱ्या यमणाप्पाचे उतारवयात कर्करोगाने ग्रासल्याने गावात फिरणे बंद होते. लग्न समारंभात अतृप्त आत्म्याला तृप्त करण्यासाठी केल्या जाणाऱ्या "वीर" विधीची जेव्हा आजारी यमणाप्पाला खबर लागते तेव्हा तो तिकडे जातो. दारूड्या विराला बघून यमणाप्पाचा राग अनावर होतो. याच रागात तो दारूड्या वीराच्या हातातून काठी हिसकावत स्वतःच्या हातात घेतो. वेसन तुटलेल्या बैलासारखा तो हिसडा मारत तो वार झेलणाऱ्यांवर तुटून पडतो. गावातील दारू विकणाऱ्या, सावकारी करून गरीबांना लुबाडणाऱ्या, आईला घराबाहेर काढणाऱ्यांना, लोकांना लुबाडणाऱ्यांना लढण्याचे आव्हान देतो. यातून गावातील वाईट प्रवृत्ती नष्ट होऊन गाव गुण्यागोविंदाने नांदावं अशी तळमळ असलेला यमणाप्पा वाचकाच्या मनात आपले घर करून जातो.


एके दिवशी आजारपणात यमणाप्पाची जिवनयात्रा संपते. तेव्हा नुसता तो एकटा संपत नाही. तर त्याच्या रूपाने दोन पिढ्यांतील दुवा संपतो. सांगावा देण्याची पद्धत यमणाप्पाच्या जाण्याने बंद होते. चिता रचण्याची मक्तेदारी संपते. मृतात्म्याला शांती मिळावी म्हणून म्हटली जाणारी हराकी महार म्हणत होता. तो मेल्याने कुणीही हराकी म्हणायला येणार नव्हता. यमणाप्पाच्या जाण्याने गावातील अनेक प्रथांचा त्याच्यासोबतच अंत झाला. लेखक मनोहर भोसले यांनी दलित व्यक्तिकडून केला जाणारा हराकी हा विधी कादंबरीचा विषय करत वाचकाला एका वेगळ्या दृष्टिकोनातून गावगाड्याकडे बघण्याचा दृष्टिकोण देण्याचा प्रयत्न केला आहे. ग्रामिण कादंबऱ्यांच्या नेहमीच्या विषयांपेक्षा 'हराकी' कादंबरीचा विषय वेगळा आणि सामाजिक जाणिवेच्या दृष्टिने महत्वाचाही आहे.

कादंबरीचे देखणे मुखपृष्ठ चित्रकार किशोर माणकापुरे यांनी साकारले आहे.

**पुस्तकाचे नाव - हराकी (कादंबरी)**
**पुस्तकाचे लेखक - मनोहर भोसले**
**प्रकाशक - तेजश्री प्रकाशन, कबनूर (कोल्हापूर)**
**पृष्ठ संख्या - १८८**

गुलाब बिसेन
संपर्क 9404235191

# मला बोलायचे आहे...



सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080

आधुनिक केसरी

**वयाची पन्नाशी ओलांडली,यातील 25 वर्ष पत्रकारितेसाठी खर्ची घातली. रा ना पवार ह्या वटवृक्षाच्या पोटी जन्म घेऊन शाहू फुले आंबेडकर विचारधारा जपून चालताना सतत सामाजिक पिंड जपण्याचा प्रयत्न केला. हा प्रयत्न करत असतांना अनेक माणसं बघितली,अनुभवली आणि वाचली देखील. इतरांना वाचत असतांना स्वतःला वाचायला लागलो. जे लिहितो त्याला सर्वसामान्यांनी दिलेला प्रतिसाद बघितल्यावर लोकांच्या मनातील भावना ओळखत ह्या भावना एखाद्या सदरातून मांडण्याची इच्छा झाली आणि ती 'आधुनिक केसरी' ने गोडवा या नावाने सदर सुरू करत संधी उपलब्ध करून दिली.**

"गोडवा" हे नाव माझ्या बाबांची देणं. सर्वांप्रती गोडवा जपणाऱ्या माझ्या बाबांची इच्छा होती,घराला "गोडवा" नाव देण्याची. गोडवा साकारला,पण त्या गोडव्यात बाबा नाहीत,हे दुःख सोडलं तर त्यांनी 'गोडवा' जपण्याचा जो संदेश दिला त्यावर वाटचाल करतोय,आणि याचाच भाग म्हणून जे जे गाव, व्यक्ती, घटना, वास्तू वा वस्तूही थोडक्यात मला आज जे अडगळीत पडलेलं वाटत असेल त्यांना समाजपटलावर आणण्यासाठी गोडवा हे माझं सदर काम करेल हा विश्वास देतो.

हे करत असतांना त्यात व्यक्ती पूजन अथवा अतिशयोक्ती असणार नाही याची काळजी देखील घेण्याचा प्रयत्न मी करणार आहे. वर्षभर गोडवा च्या माध्यमातून आपल्या संपर्कात राहण्याची संधी दिल्या बद्दल आधुनिक केसरी चे आभार !

खरं म्हणजे ह्या सदराची जबाबदारी ज्या काळात माझ्या खांद्यावर आली तो काळ माझ्या साठी जरा जिकरीचाच.

माझ्यावर लहान भावासारखे प्रेम करणारा,आयुष्यभर ज्या माणसाने सर्वांप्रति गोडवा वाटण्याचे काम केले,ज्यांनी वेगवेगळ्या ठिकाणचे मित्र भाऊ पाटील या परिवाराला जोडून मित्र परिवार मोठा करत स्वतः एक्झिट घेतली आणि राज्यातील विविध ठिकाणच्या मित्रांना कायमचे दुःखसागरात सोडून गेला असे समाधान भाऊ सावळे पाटील उपाख्य भाऊ पाटील यांचे 3 डिसेंबर रोजी झालेले निधन आणि माझी पत्नी सौ अर्चना हिचा एकुलता एक भाऊ गजानन गोळे याने वयाच्या 48 व्या वर्षी घेतलेली एक्झिट ह्या दोन दुःखातून सावरणे बाकी असतांना "गोडवा" वाटण्याची जबाबदारी स्वीकारावी लागली आहे.




काही माणस तुमच्या आयुष्यात येऊन तुमचे भावविश्व व्यापून टाकत असतात. इथे तर समाधान सावळे नावाच्या सुपाएव्हडे काळीज असणाऱ्या आणि आभाळाएव्हडी उंची असणाऱ्या माणसाने केवळ माझंच नव्हे तर असंख्य मित्रांचे भावविश्व व्यापून टाकले होते. सर्वांना एकत्रित आणणे, आणि आनंदाचे दान सर्वांच्या पदरात टाकणे हाच या माणसाचा छंद होता.भाऊ पाटील ह्या व्यक्तिमत्वावर मी स्वतंत्रपणे लिहणार आहेच,मात्र माझ्या सदराला सुरुवात करतांना भाऊ पाटील आणि गजानन गोळे ह्या दोघांचे स्मरण होणे स्वाभाविक आहे.

माझ्या नावाने एकरातील सात बारा नगण्य.मात्र हजारो मित्र हीच माझी संपत्ती असल्याने माझा हा सातबारा समृद्ध झाला आहे. 'भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे' ही ताकद देणारे गोपालभाऊ मोदानी,डॉ सुभाष लोहिया व संपूर्ण महेश परिवार असेल, बौद्धिक मेजवानी देणारा आणि सतत संवाद साधून व्यक्त होण्याचं ठिकाण असणारे साहित्यिक अजीम नवाज राही असतील,पत्रकारितेतील माझे सर्व सहकारी असतील.माझ्या सामाजिक आवडीची दखल घेत स्व अरविंद उमाळकर वृद्धाश्रम चा आमचा संपूर्ण संचालक मंडळाचा गोतावळा असेल, मला 'लिहता हो' अस सांगणारा साहित्यिक मित्र किरण डोंगरदिवे असेल ही प्रातिनिधिक नावे माझी संपत्ती आहे.

सिद्धेश्वर पवार या नावाला ज्यांनी ठाशीव ओळख करून दिली ते देशोन्नती चे एडिटर इन चीफ प्रकाशभाऊ पोहरे, पत्रकार म्हणून ज्यांनी मला आकार देण्याचे काम केले ते आवृत्ती संपादक राजेश राजोरे असतील ही नावे माझ्या आयुष्याची संचित आहेत. लिखाण आणि वक्तृत्व ही मला मिळालेली 'गॉड गिफ्ट' नसून ती 'डॅड गिफ्ट' आहे. आणि वडिलांकडून मला जी ही अमूल्य देणं मिळाली आहे त्याचा उपयोग सकारात्मक दृष्टीकोन नजरेसमोर ठेवून हे सदर सकारात्मकतेला आणि समाजाला अर्पण करणार आहे. हा गोडवा तुमच्या पर्यत पोहचल्यावर त्यावरील तुमची प्रतिक्रिया कधी माझे लेखनबळ वाढवतील तर कधी माझ्यात सुधारणा घडवून आणतील म्हणून तुम्ही सर्व वाचक ह्या गोडव्याचे सच्चे आस्वादक म्हणून मला साथ द्याल ही अपेक्षा.

# रंगीरंगलाश्रीरंग

आधुनिक केसरी

" गुबुगुबु..गुबुगुबु...गुबुगुबु " सकाळी सकाळी कानावर असा विशिष्ट आवाज करत दारात नंदीबैल आणि हेळवी दारात आला....... सुमतीबाईंनी तात्याला हाक मारून पायलीभर गहू काढून ठेवायला सांगितलं...... वाड्यात आलेला कोणीच आतापर्यंत विन्मुख गेला नाही. आज बऱ्याच वर्षांनी नंदीबैलवाला आला होता.

गुबुगुबु आवाज ऐकून वाड्यातली लहान थोर मंडळी एकएक करीत ओसरीवर आली ...... सुधीर, सुहास,जयंत, कमल , कुसुम शेंडेफळ सुधा सगळी धावत ओसरीलगतच्या पायऱ्यांवर ओळीत बसली.....



सौ. आरती राजाराम
परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345

हा पुढं शिकून मोठा होणार........ हा परदेशात जाऊन तिकडचाच होणार .....हिला श्रीमंत सासर मिळेल........ हिच्या तब्येतीच्या तक्रारी चालू राहतील.....तुला अहवेपणी मरण येईल..... एक ना दोन सगळ्यांबद्दल भाकीत सांगत होता , पण सुधाबद्दल एकही अवाक्षर काढलं नाही......

सुमतीबाईंना जरा नवलच वाटले.... पण भाकीतच ते असेल काहीतरी..... काही वेगळं असणार म्हणून काही बोलला नसेल का ?....एक ना दोन शंकांनी अस्वस्थ झाल्या ....... पण परत कामाच्या व्यापात गढून गेल्या..... घड्याळाचा काटा पुढे पुढे पळत होता.... नियतीचा कालचक्र आपल्याच गतीनं फिरत होते. सुधीर खुप शिकून मोठा ऑफिसर झाला ,तर सुहास लंडनमध्ये स्थिरावला , कमलचे गावातल्याच खात्यापित्या घरात लग्न झाले.... कुसुम डॉक्टर होऊन मोठ्या दवाखान्यात प्रॅक्टिस करत होती... **क्रमशः**

# सकारात्मक तत्त्वज्ञान: मर्यादा का ओलांडतोय ?



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**आशा-आकांक्षांचे पंख लेवून आकाशात स्वैर विहार करणारा पतंग पाहून अनेक जण प्रफुल्लित होतात. आपल्या हाती असलेल्या दोऱ्याला जोडलेला पतंग आकाशात डोलतोय याचे अप्रूप पतंग उडवणाऱ्याला तर असतेच, पण त्याला साथ देणाऱ्या आणि पाहणाऱ्यांनाही आनंदी करणारा तो क्षण असतो. जगात कुठेही अत्यंत कमी किमतीत मिळणारे हे हलके खेळणे अनेक अर्थांनी जीवनाचे तत्त्वज्ञानही सांगते. आकाशात झेपावतानाही आपले पाय जमिनीवर आहेत, हे विसरता कामा नये. मातीशी, मूळ तत्त्वांशी असलेली नाळ तुटली की आपण कोणत्याही क्षणी जमिनीवर येऊ शकतो.**

आकाशात झेप घेणे हे काही एका झटक्यात होणारे काम नाही, त्यासाठीही अनेक प्रयत्न करावे लागतात. एकदा आकाशात गेल्यावर अर्थात यशस्वी झाल्यावर आपल्याला काही धोका नाही, या भावनेने गाफील राहू नये, आपण कधीही काटाकाटीचे बळी ठरू शकतो, हे तत्त्वज्ञानही पतंगबाजी शिकवते. जमिनीवरून हळूहळू आकाशाकडे झेप घेतली तरच त्याचा अथांगपणा लक्षात येतो, ही शिकवणही पतंग देतो. भारतीय आणि जगातील काही देशांच्या संस्कृतीत पतंगबाजीला विशेष महत्त्व आहे. हिवाळ्यातच पतंग उडवण्याचे आणखी एक कारण म्हणजे सकाळपासून थंडीत काकडणाऱ्या बच्चे कंपनीला तसेच मोठ्यांनाही गच्चीवर किंवा खुल्या मैदानात सूर्याची नैसर्गिक ऊब मिळते. एकूणच सकारात्मक तत्त्वज्ञान शिकवणारा, कुटुंबीयांना, मित्र-मंडळींना आनंद देणारा हा खेळ जेव्हा स्पर्धेची रंगत घेताना मर्यादा ओलांडतो, तेव्हा मात्र त्यातील नकारात्मकता अधिक जिव्हारी लागते. पूर्वी साधा दोरा किंवा अतिधारदार नसलेला मांजा वापरून पतंग उडवणे, काटाकाटी खेळणे, कटलेला पतंग पकडण्यास धावणे, असे चालत असे. आजही याप्रकारे पतंग खेळले तर ते ठीकच राहिल. परंतु या स्पर्धेसाठी आज नायलॉन धागा, प्लास्टिक, काच, धातूचा चुरा आणि विविध रसायने लावलेला धोकादायक मांजा वापरणे, हे अनेकांच्या जिवावर बेतणारे ठरते. पूर्वी मुले मांजा घरी घोटून तयार करत, ते तसे कमकुवतच असे. मात्र आजघटकेला मांजा दुकानातूनच चांगला मजबूत असा रेडिमेट मिळू लागला आहे. या अनुषंगाने संक्रांतीच्या पहिल्या वहिल्याच दिवशी अतिशय निराशाजनक, क्लेषदायक, दुःखद बातम्या धडकू लागतात, तेव्हा प्रियजनांच्या या महोत्सवाबद्दल काय प्रतिक्रिया उमटत असतील ? याची कल्पना न केलेलीच बरी! त्यांचा टाहो आनंदाने रंगीबेरंगी पतंगाने फुललेला आसमंत चिरून टाकतो, "अहो साहेब, अशा बाजारातून मिळणाऱ्या रेडिमेट मांजावर बंदी घाला होऽऽ! नाहीतर कोणीतरी जीवघेण्या या पतंग उडविण्यालाच पायबंद लावा होऽऽऽ...!!"

अंगाचा थरकाप उडविणाऱ्या बातम्यांच्या हेड लाइन्स टिव्हीवर व पेपर्सवर अशा असतात- पतंगाच्या नादात तरूण पडला इमारतीवरून... जयपूरमध्ये कैक लोक पतंगबाजीत रमले खरे, मात्र मांजाने ३०० जण घायाळ. ...या शहरातील सर्वच रुग्णालयांमध्ये पतंगबाजीमुळे जखमी झालेल्या रुग्णांच्या रांगाच रांगा. सवाई मानसिंग रुग्णालयात २२७ पेक्षा जास्त रुग्णांवर उपचार सुरू. कटलेला पतंग पकडण्याच्या नादात चार वर्षांचा मुलगा गच्चीवरून पडला, त्याच्या मेंदूला गंभीर इजा झाली. तर एक तरुण दुचाकीखाली आल्याने दोन्ही पाय गमावून बसला. मांजाने चिरला शिक्षकाचा गळा. मांजाने सोलले पाणी भरणाऱ्या युवतीचे पाय. देशभरातील विविध राज्यांमध्ये अशी कित्येक उदाहरणे सापडतील. नाशिकमध्ये पतंग उडवताना इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरून पडल्याने सुफियान निजाम कुरेशी हा १७ वर्षीय युवक मृत्युमुखी पडला. अकोल्यात दोघे जखमी तर राहत्यात आणखी एकाचा बळी गेला. अनेकदा दुचाकी चालवताना गळ्याशी केव्हा मांजा येतो आणि कधी गळा चिरून जातो, हे कळतही नाही. अशा दुर्घटनांमुळे बळी गेलेल्यांची, जखमींची संख्याही मागील काही वर्षांत वाढली आहे. इतकेच नव्हे, तर आकाशच ज्यांचे निसर्गदत्त विहार करण्याचे



हक्काचे स्थान आहे, त्या पक्ष्यांसाठीही मांजा काळ ठरला आहे. माणसे जखमी झाल्यावर उपचारासाठी धावाधाव तरी करतात. पण मुके प्राणी, पक्षी कोणत्या कोपऱ्यात रक्तबंबाळ होऊन पडतात, याचा थांग लागणे कठीणच. यासाठी अनेक पक्षिप्रेमी आणि सजग नागरिक, संस्थांनी जनजागृती कार्यक्रम हाती घेतले आहेत. पतंग उडवताना सतर्क असणे, आपल्या तसेच इतरांच्या जिवावर ते बेतू नये, याची काळजी घेणे तसेच धारदार मांजाचा वापर कटाक्षाने टाळणे, अशी काही पथ्ये पाळण्याबाबत जनजागृती करण्यात येते. त्याला पतंगवेड्यांनी उत्तमप्रकारे प्रतिसाद दिला पाहिजे.

भारतात पतंग उडविण्यावर बंदीच आहे. पतंग उडविणाराला लाखो रुपयांचा दंड ठोठावून कडक कारवाई करण्याचे कायद्यात नमूद आहे. मात्र हा कायदा अजूनही बासनात गुंडाळून ठेवला गेला आहे. तो आजच्या घडीला उघडण्याची नितांत आवश्यकता भासत आहे. बाजारात मिळणारा रेडिमेट मांजा प्रथमात प्रथम बंद करण्यात यावा. जीवघेण्या मांजाच्या विरोधात संपूर्ण महाराष्ट्रच नव्हे तर भारतभरच मोहीम सकारात्मक अर्थाने प्रभावीपणे राबवली पाहिजे. शाळा, महाविद्यालयांमध्ये घातक मांजा वापरणारच नाही, अशी प्रतिज्ञा घेण्यात यावी. सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय, हरित लवाद यांनी घातलेली बंदी कडक करावी. पोलिसांचे सहकार्य आणि नागरिकांनी दाखवलेली सजगता यामुळे चिनी, नायलॉन मांजाची विक्री कमी झाल्याचे आढळले पाहिजे. त्यामुळे दरवर्षीचा पतंगोत्सव असुरक्षिततेची भावना काही प्रमाणात का होईना कमी करणारा ठरला पाहिजे, यात हयगय होता कामा नये. राज्यभरातील पतंगप्रेमींनी हा कित्ता आवर्जून गिरवला पाहिजे. पतंगोत्सव साजरा करताना थोडे समाजभान ठेवले तर आनंदावर विरजणही पडणार नाही, तसेच भविष्यात पतंगबाजीवर सरसकट बंदीचा धोकादेखील उद्भवणार नाही. खरे तर हिवाळ्यातील थंडी आणि उन्हाचा एकत्रित अनुभव देणारा पतंग आपल्या भावी पिढ्यांनाही आनंददायी ठरावा, यासाठी आपणच काळजी घ्यायला नको का ? पशू, पक्षी, मानव यांना घातक ठरणाऱ्या जीवघेण्या नायलॉन मांजाची आपणच खरेदी वा विक्री केली नाही तर होणाऱ्या घटनांना आपोआप ब्रेक लागेल, यात दुमत नाहीच!

# पतंग उडवू चला गडयांनो पतंग उडवू चला...

आधुनिक केसरी

संक्रात जवळ येऊन लागताच खेळ सुरु होतो तो पतंगाचा.वेगवेगळ्या रंगाचे वेगवेगळे पतंग उडविण्यात वेगळाच आनंद असतो.ग्रामीण भागाप्रमाणेच शहरी भागातही संक्रातीला पतंग खेळण्याचा आंनद मोठ्या प्रमाणात घेतला जातो. या सणाला मोठ्या प्रमाणात मुले नागरिक एकत्र येत मोठ्या आवाजात गाणे वाजवत पतंग उडविण्याचा आंनद घेत असतात. काही ठिकाणी एक तर काही ठिकाणी दोघे जण तर काही ठिकाणी खूप सारे जण एकत्र येत पतंग उडवित असतात.यात एकाने पतंगाची दोरी पकडणे दुसऱ्याने पतंग लांब घेऊन जाणे व वाऱ्याची दिशा बघून हवेत पतंगाला झेपवणे.पतंग हवेत झेप घेताच दोरी पकडणाऱ्याचे कौशल्य महत्वाचे असून त्याने ढील देत योग्य पद्धतीने पतंग खाली येऊ न देता उडवत ठेवत त्याचा आनंद घेणे. मैदानी खेळा बरोबरच पतंग हा खेळ खेळण्यासाठी सुद्धा कौशल्याची गरज असते.

कोणताही सण आला की मग शाळेत शिकलेली बडबडगीते कविता यांची आठवण होतेच.जसं संक्रात म्हणजे पतंगाचा सण आला की प्रत्येकाच्या हृदयावर कोरलेली कविता म्हणजेच

*'पतंग उडवू चला गडयांनो पतंग उडवू चला*
*रंग ढगावर मावळतीचा*
*लाल पिवळसर किती मजेचा*
*झुळझुळं वारा नदीकाठाचा*
*बाजूस डोंगरमळा*
*करू चला सुरुवात बरोबर*
*सोडा सोडा रीळं भराभर*
*पतंग चढवा हे वाऱ्यावर*
*ढगास भेटायला'*

ह्या काव्यपंक्ती सहज ओठावर येतात व आंनद द्विगुणित होतो.संक्रात या सणाचे महत्व अनन्यसाधारण असून महाराष्ट्र राज्यासह संपूर्ण भारतात पतंग खेळण्याचा आंनद मोठ्या प्रमाणात घेतात. ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात पतंग उडविणे आता अडचणीचे झाले आहे.

कारण मोकळी जागा आता मोठ मोठया इमारतीनीं घेतली आहे अन आता शहरात पतंग हे गच्चीवर उडविले जातात त्यामुळे मुलांनी नागरिकांनी घरावर पतंग उडवत असताना योग्य ती काळजी घेत पतंग उडविण्याचा आंनद घेतला पाहिजे. आता पतंग उडवीताना नायलॉन चा मांजा मोठ्या प्रमाणात वापरल्या जातो. तसें प्रशासनाने त्यावर बंदी आणली



असून त्यावर कारवाई पण करण्यात येत आहे तरी लपून छपून शेवटी तो मांजा आपल्यापर्यंत येतो आणि खेळण्याचा आंनद घेण्याच्या नादात आपण इतरांना इजा पोहचवत असतो.शक्यतो नायलॉन चा मांजा न वापरता इतर मांजा अर्थात धागा वापरून आपण पतंग उडवू शकता.पतंग उडविण्याचा आंनद जरूर घ्या पण इतरांना व आपल्याला इजा होणार नाही याची काळजी पण आपण घेतली पाहिजे.

नागरिकांनी पण सध्या हा महिना तरी स्वतःची काळजी म्हणून दुचाकीस्वार असतील किंवा सायकल स्वार यांनी मानेभोवती रुमालची घडी करून अथवा मफलरचा वापर करावा मान सुरक्षित ठेवत प्रवास करावा जेणेकरून शारीरिक इजा होणार नाही.

तर चला मग मित्रांनो इतरांची व स्वतःची काळजी घेत एक सजग नागरिक बनत या नवीन वर्षाचा पहिला सण संक्रात हा पतंग या खेळाने साजरा करूया.

राहुल त्रिभुवन
संपर्क 8793433287

# आईच्या हातचे दही धपाटे आणि शेंगदाण्याची चटणी

आधुनिक केसरी

**पौष रविवार असल्यामुळे प्रकार्षाने सायंकाळी देवासमोर दिवा लावताना आईच्या हातच्या धपाटयाची आठवण झाली. पौष महिन्यातील रविवारी मराठवाड्यातील महिलाभगिनी सकाळीच सूर्योदयाला पाटावर सूर्यनारायणाची रांगोळी काढून मनोभावे पूजा करतात. रविवारी भोजनास हमखास धपाटे , दशमी आवर्जून करतात. लेख लिहीताना लहानपणीचे शालेय दिवस आठवले पौष महिन्यात थंडी असल्यामुळे रविवारी सकाळी झोपेतून जाग आली तरी मी गोधडी डोक्यावर घेऊन मस्त लोळत असे. आई मात्र कडाक्याच्या थंडीत पहाटे पाच वाजता उठून सर्व घरातील कामे आवरायची व सूर्योदयाला पाटावर रांगोळीने सूर्यनारायण काढून पूजा करायची.**





मला तर आईचे नवल वाटायचे एवढ्या कडाक्याच्या थंडीतही ती नित्य धार्मिक कार्यक्रम करायची. कार्तिक महिन्यातल्या बोच-या थंडीतही आई सकाळीच पहाटे पाच वाजता उठून गांधी पार्कातील विठ्ठल मंदिरात काकड आरतीला जायची.

पौष रविवारी सकाळी सूर्यनारायणाची पूजा केल्यावर मला आई झोपेतून उठवायची. मुखमार्जन झाल्यावर आई मला दूध द्यायची व सांगायची दत्ता आज पौष रविवार आहे आज धपाटे करायचे आहेत.वाड्यात दहीवाले नारायण मामा आल्यावर दही घ्यायचे आहे लक्षात राहू दे . हे ऐकल्यावर माझ्या अंगातील रविवारचा आळस पळून जायचा कारण आई स्वयंपाकात धपाटे करणार म्हणून तोंडाला पाणी सुटलेले असायचे.

नारायण चाळीत अण्णांच्या वाड्यात दररोज भेंडेवाडीचे दहीवाले नारायण मामा दही विक्रीसाठी आणायचे. गंगाखेड पासून जवळच पाच किलोमीटर अंतरावर भेंडेवाडी हे पाचशे लोकवस्तीचे छोटेसे गाव आहे.


या गावचे वैशिष्ट्य म्हणजे येथील शेतकरी बांधव दही विक्रीचा व्यवसाय आजही करतात.

माझ्या लहानपणी गंगाखेड येथून सकाळच्या रेल्वेने नारायण मामा दही घेऊन येत. परभणी रेल्वे स्थानकाच्या बाहेर तीस वर्षांपूर्वी सायकल टॅक्सीचे दुकान असायचे तेथून टॅक्सीची सायकल भाड्याने घेऊन दहीवाले नारायण मामा सकाळी नऊ पर्यंत वाड्यात यायचे. नारायण मामाचे दही म्हणजे नंबर एक घट्ट आणि मधुर असायचे. त्याकाळी दह्याचे मूल्य चार रूपये लिटर होते. आई नारायण मामाकडूनच दही घेत असे अडीअडचणीला हे दहीवाले नारायण मामा उधारही दही द्यायचे. आई खूप छान धपाटे करायची लेख लिहीतांना धपाटयाची ती चव आजही जिभेवर रेंगाळत आहे. त्याकाळी घरची परिस्थिती तशी बेताचीच होती तरीही कोडयांचा मांडा करून आई सणवार साजरा करायची. रविवारी दुपारी बारा वाजता वाड्यातील माता भगिनी उंबराच्या झाडाखाली ओट्यावर एकत्र येत. शेजारच्या आजी पौष रविवारची कहाणी सांगायच्या ती कहाणी आम्ही बालगोपाळही आवर्जून श्रवण करायचो. कारण कहाणी संपल्यावर लहान्यांना बोर खायला भेटायची व नंतर स्नेहभोजनाचा कार्यक्रम व्हायचा. आईच्या हातचे धपाटे चवदार व्हायचे तोंडात धपाटे ठेवले की चावाायचेही काम नसे.

शेजारच्या आजीही दात नसताना आईचे धपाटे खायच्या. आजोळी तर आईचे धपाटे सर्व मामांना व भाच्चेकंपनीला आवडायचे.आजोळी गंगाखेडला कार्यक्रमानिमित्त सर्व मामा एकत्र आले की आई धपाटे आवर्जून करायची. खळीला शेतात हुरडा खाण्यासाठी जायचो त्यावेळी तर आई आवर्जून धपाटे करायची. आई धपाटयासोबत शेंगदाण्याची चटणी करायची. आईच्या हातची शेंगदाण्याची चटणी चवदार व चविष्ट व्हायची. बरं त्यावेळी घरी मिक्सर नव्हते. शेंगदाणे खरपूस भाजून दगडी खलबत्त्यात ते कुटायची. तिखट प्रमाणातच असायचे. १९९२ मध्ये आई घरगुती मेस चालवायची नूतन महाविद्यालयाचे मराठीचे प्राध्यापक श्री पडघन सर व त्यांचे तीन प्राध्यापक मित्र घरी भोजनासाठी यायचे. त्यावेळी पडघन सर देवगिरी महाविद्यालयात कार्यरत होते. आईच्या हातची शेंगदाण्याची चटणी सरांना खूप आवडायची. कधीकधी सरांसोबत औरंगाबाद येथील देवगिरी महाविद्यालयाचे प्राचार्य जाधव सर भोजनांसाठी यायचे. जाधव सरांना तर शेंगदाण्याची चटणी पोटातून आवडायची. जाधव सर तर आईला चटणीवाल्या मावशीच म्हणायचे. आज बाजारात सोलापूरची शेंगदाणे चटणी विकत मिळते पण त्या शेंगदाण्याच्या चटणीला आईच्या हातची चव नाही. आईच्या शब्दकोशात कंटाळा हा शब्दच नव्हता. आईचे जीवन कष्टमय गेले.

खरच ते दिवस खूप छान सोनेरी होते. आज सायंकाळी पौष रविवार असल्यामुळे सर्व आठवणी स्मृतिपटलावर अधोरेखित झाल्या व त्या आठवणी शब्दबद्ध केल्या.

रामकृष्ण जोशी
संपर्क ९५२७४५४१८२



# आई कोठे गेली तू....

आधुनिक केसरी

काय बोलू,अन् कसे बोलू तेच समजत नाही...जिने आम्हाला जन्म दिला,तळहातावरच्या फोडाप्रमाणे जपले,संस्कार दिले,लहानाचे मोठे केले...मोठ्या थाटामाटात आमची लग्न करून दिली.... लग्नानंतर ही आमचे सर्व सण,आमच्या मुलांनाही तिनेच लहानाचे मोठे केले? ...अजून किती तरी गोष्टी तुझ्याच हातून घडल्या पाहिजे होत्या ना आई....ही माफक अपेक्षा आमची होती...तू व आण्णा नित्य आमच्या सोबत असावे..तुमचा आशीर्वाद,तुमची साथ,तुमचे मार्गदर्शन... अन् मन व्यक्त करण्यासाठी हक्काचा पदर पण तेच या क्रूर विधात्याने आमचे काळाआड नेले... असे करून त्याला तरी काय मिळाले? शाळा सुटली की नित्य नेमाने तुझ्याशी बोलणे...मला बरे नसेल किंवा काही चीड चीड झाली असेल तरच मी आल्या आल्या लगेच फोन करत नव्हते ग.... कारण मला समजत माझ्या आवाजावरून तुला माझ्या मनातील सारे समजायचे ..तुला दुःख होवू नये म्हणून तुला तेव्हा मी फोन करणे मुद्दाम ग टाळत..पण..दिवस भर माझ्या फोन ची वाट पाहून शेवटी संध्याकाळी किंवा रात्री तू आण्णांना मला फोन करायला लावतच ..किती माया,प्रेम,ओढ होती ती.....एक शब्द बोलणे किती महत्त्वाचा होता.....मम्मी,एकदा तरी तू सांगायचे ना मला बरे नाही वाटत ....अशी हसत खेळत तू कशी निघून गेलीस......आम्हाला तुझी गरज आहे .... तुला आमच्यासाठी .....जगायचे आहे .......१३/१२/२२ ला ही आपण दुपारी २ वाजता ही भरपूर बोललो....माझ्या आधी तू पहिल्यांदा कित्येक वर्षातून जेवायला बसली होती ....मी बोलले की आज सूर्य कोणीकडून उजाडला ....आण्णा ही बोलले.....आज काही न बोलता चल जेवायला म्हटलो तर लगेच जेवायला बसली...किती छान वाटले आम्हाला....आपण बोलत होतो ,तर आण्णा बोलले तिला जेवू दे..तर मी रागावले....मी ही जेवतेच ना?... लेकीशी बोलल्यावर तिचा घास कमी नाही होणार? चार - पाच घास जास्तच खाईल ? किती हसली होती तू व आण्णा.....माझा लाडीक राग पाहून ......अन् तू वचन ही दिले होते की हॉस्पिटल मध्ये संध्याकाळी जाणार? रेग्युलर चेक अप करणार? तुल कधी स्वप्न च पडत नव्हती अन् अचानक दोन तीन दिवसापासून तुला स्वप्न पडायला लागली..... आम्हाला वाटले तुला आता छान झोप येत असेल..म्हणून स्वप्न पडू लागले.. किती छान वाटले होते....की तुला आता झोप लागत होती...पण,तू अशी आम्हाला सोडून कायमची चीर निद्रा घेशील असे वाटलेच नाही ...तू,झोपत नव्हती तेच ठीक होते ग मम्मी... तुला खूप एकटे एकटे वाटत होते? म्हणून च तुला माझ्याकडे ये असे बोलले तर तू हो ही बोलली,आण्णा ही तयार झाले यायला.माझे घर खालीच असते तर किती बरे झाले असते? सर्व जर - तरच्या गोष्टी... फक्त एकदा बोलायचे होते मला असे असे होते? आम्ही चौघे होतो ना तुला हव्या त्या हॉस्पिटल मध्ये नेवून बरे केले असते .तू हिंमत थोडी ठेवायची होती ना? जे आले घ्यायला त्यांना ही तुला नकार देता आला नाही?आमच्यासाठी तरी तू त्यांना नकार द्यायचा होता ना? मला माझी मुले,तुम्ही दोघे,भाऊ,वहिनी,बहिणी ,भाच्या,सोडून जवळचे असे कोण होते ग,आहे?... किती अन् काय -काय सहन करायचे मी? काय असा माझा गुन्हा की ज्यामुळे मला हे सहन करावे लागते.... अजून किती जणांचा विरह मी सहन करू.....अरुण नंतर मी कशी- बशी जगायला शिकले ?उभी राहिली? नोकरीला नसते तर काय अवस्था झाली असती माझी व माझ्या लेकरांची?...अन् त्या नंतर तू असा धक्का दिला? ..... खरचं देव आहे का ग? तो असता तर असे किती दुःख तो माझ्या पदरात देणार आहे?.....अरुण जरी आता देवाघरी असेल तरी मी तुझी मुलगीच ना? मुलगी होणे, बायको होणे हा गुन्हा असतो का?

**क्रमशः**

सौ. प्रतिमा अरुण काळे
निगडी प्राधिकरण पुणे,४४

# क्रांतीनायिका मुक्ता साळवे यांच्या 184 व्या जयंतीनिमित्त

आधुनिक केसरी

**माणसा -माणसात भेद करणारे धर्म, पृथ्वीतलावरून नष्ट होवोत! अशी गर्जना करणारी, विद्रोही निबंधाची जननी, क्रांती नायिका मुक्ता साळवे यांच्या 184 व्या जयंतीनिमित्त मुक्ता साळवेच्या सत्यशोधकी विचारधारेला क्रांतिकारी अभिवादन! क्रांतिवीर लहुजी साळवे यांची पुतणी तर भारतीय शैक्षणिक इतिहासातील बहुजनांच्या अर्थात महात्मा फुलेंच्या शाळेतील पहिले शिक्षक गणू शिवा मांग यांची मुलगी, मुक्ता साळवे यांचा जन्म 5 जानेवारी 1839 साली झाला. क्रांतिवीर लहुजी साळवे आणि साथिदारांच्या मदतीने 1848 साली निर्माण झालेल्या, महात्मा फुले यांच्या पहिल्या शाळेतील विद्यार्थिनी, मुक्ता साळवेनी वयाच्या नवव्या वर्षी शाळेत प्रवेश घेतला. मुक्ता साळवे ही क्रांतीपिता महात्मा फुले नि सावित्रीमाईच्या पहिल्या शाळेतील विद्यार्थिनी.**

शाळेत 12 फेब्रुवारी 1853 रोजी तिसरी या वर्गाची परीक्षा संपन्न झाली. तिसऱ्या वर्गाच्या परीक्षेचा भाग म्हणून मुक्तां साळवेनी "मांगा -महारांच्या दुःखाविषयीचा" निबंध लिहिला. जो निबंध भारतीय परंपरेची, पारंपारिक देव -धर्म व्यवस्था आणि धर्मव्यवस्थेच्या ठेकेदारांची चिकित्सा करणारा निबंध, हा परखड, विद्रोही, मार्गदर्शक आणि चिंतनीय आहे. भारतीय संस्कृतीनी निर्माण केलेले आणि बहुजनांच्या माथी मारलेले संस्कृतीचे नियम नाकारणारा, स्त्री साहित्याच्या जगतातील आणि निबंध या साहित्य प्रकाराच्या इतिहासातील पहिला निबंध 1853 साली मुक्ता साळवेंनी लिहिला. तेव्हा मुक्ता साळवे ह्या 14 वर्षाच्या होत्या. हे जाणीवपूर्वक समजून घेण्याची गरज आहे.

वयाच्या 14 व्या वर्षात मुक्ता मध्ये निर्माण झालेला निर्भयपणा - धाडस आणि पारंपरिक एका बलाढ्य व्यवस्थेच्या विरोधात लिहिलेला सत्यशोधकी एल्गार , हा सहजपणे निर्माण होत नाही, तर पाठीशी एका परिवर्तनवादी संस्काराची जडण-घडण लागते. तेचं संस्कार मुक्ता साळवेना त्यांच्या साळवे घराण्याकडून मिळालेला आहे. मुक्ता साळवे यांचे आजोबा- खप्पर पणजोबा यांना छत्रपती शिवाजी राजाच्या स्वराज्य स्थापनेमध्ये इमानी- इतबारे कर्तव्य बजावीले म्हणून, शिवाजी महाराजांनी 'राऊत' ही पदवी प्रदान केलेल्या साळवे घराण्याची वैचारिक वारसदार म्हणून मुक्ता साळवे ही क्रांतिवीर लहुजी साळवेचा क्रांतिकारी-वैचारिक संस्कार आहे. असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. 1853 मध्ये प्रकाशित झालेल्या "Native female schools in Puna" च्या इंग्रज शासनाच्या द्विवार्षिक अहवालामध्ये त्या निबंधाची प्रशंसा केली आणि त्या अहवालात लिहिले, When the examination was over, prize of sarees and book were presented to the girls by Mrs E.C.Johnes, patroness of the schools. One little girl, "Mukta" when informed that, she was to receive the prizes, and said, "don't give us prizes give us library " this same little girl sits up every night Till twelve O'clock to study her Marathi and English lessons.!



इंग्रज सरकारच्या वार्षिक द्वितीय अहवालामध्ये मुक्ता साळवेच्या संबंधांने मांडलेले विचार, तिने इंग्रजी शासनाकडे मिळवीलेली शैक्षणिक अचिएव्हमेन्टच आहे. ( Achievement ) हे भारतीय स्त्रियांच्यासाठी अभिमानाची गोष्ट ठरते. मुक्ता साळवेनी अवघ्या वयाच्या चौदाव्या ( 14व्या ) वर्षात या देशातील पारंपारिक देवधर्माची- कर्मकांडाची चिकित्सा केली. पारंपारिक वैदिक धर्माला मुक्ताने नाकारले, धर्माच्या नावे निर्माण केलेल्या सर्व धर्मग्रंथांनाही नाकारले. आणि सर्वसामान्य उपेक्षित, बहुजन माणसांच्या दुःखाचे मूळ कोणते ? तर, त्या दुःखाच्या मूळाचे मुक्ताने संशोधन केले. आणि दुःखाचे 'मुळ' शोधले. हे ऐतिहासिक सत्य लपविता येत नाही . मुक्ता साळवेचा निबंध, 15 फेब्रुवारी 1855 आणि 1 मार्च 1855 अशा दोन अंकात " महारा-मांगाच्या दुःखा विषयी निबंध " या शीर्षकाखाली 'ज्ञानोदय ' या पाक्षिकात दोन वेळा छापला गेला. त्या पाक्षिकाचे संपादक, ( Dr Samual Becon ferbank ) "डॉक्टर स्वॅम्युअल बेकन फेअरबँक" यांनी पहिल्यांदा तो दोन भागात प्रकाशित केला. 1855 सालच्या सरकारी शैक्षणिक अहवालात इंग्रज सरकारने, मुक्ता साळवे यांच्या निबंधाला प्रसिद्धी दिली. त्यानंतर "पुणे शहराचे वर्णन" या पुस्तिकेतही ना. वी. जोशी यांनी मुक्ताचा निबंध पुन्हा प्रकाशित केला. मुक्ताचा हा गाजलेला विद्रोही निबंध वेगवेगळ्या मासिकातून, पाक्षिकांतून आणि सरकारी अहवालातून प्रकाशित होणे. हेच मुळात या निबंधाचे महत्व आहे. हे निर्विवाद सत्य. मुक्ता साळवे यांच्या निबंधावर चिंतन करत असताना, जाणीवपूर्वक लक्षात घेण्यासारखी आणि विचार करण्याची बाब ही की, क्रांती पिता क्रांतीबा ज्योतिबा फुले यांनी हिंदू धर्माला पूर्णतः नाकारून धर्म पंडितांना, धर्म प्रेषितांनाही नाकारून, हिंदू धर्माची शुद्धीकरण करण्याचा प्रयत्न करूनही, हिंदू धर्माचे शुद्धीकरण झाले नाही म्हणूनच महात्मा फुले यांनी 1873, यावर्षी "सत्यशोधक समाजाची" स्थापना केली तर हिंदू धर्माला पर्याय म्हणून समाजात सत्यशोधकी जीवन जगण्याची नवी प्रक्रिया म्हणून 1887 या कालखंडात अर्धांग वायूने आजारी असतानाही, "सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक" धार्मिक ग्रंथ निर्माण करून, सत्यशोधनातून विवेकी नि विज्ञाननिष्ठ जीवन जगावे, त्यातून समताधिष्ठित समाज व्यवस्था निर्माण व्हावी. यासाठीच, महात्मा फुलेंचा आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा आयुष्यभर खटाटोप होता. त्यात क्रांतीपीता महात्मा फुले समवेत, क्रांतिवीर लहुजी साळवे, सावित्रीमाई, गणू शिवा मांग, धुराजी अप्पाजी चांभार, फातिमा शेख बीबी ( उस्मान शेखची बहिण ) मुक्ता साळवे या देशातील पहिल्या शिक्षण क्षेत्रातील पहिले समाज शिक्षक यांच्या त्याग -समर्पणाचा प्रचंड मोठा भाग होता. ते जाणीवपूर्वक मुक्ता साळवे जयंतीनिमित्त चिंतन केले पाहिजे. असे मनोमन वाटते. उद्या 5 जानेवारी 2023 गुरुवार रोजी, क्रांती नायिका मुक्ता साळवे यांची 184 वी जयंती क्रांतिवीर लहुजी साळवे कर्मचारी कल्याण महासंघाच्या महाराष्ट्रातील सर्व शाखेंनी, सर्व समाज बांधवांनी,विविध सामाजिक संघटनेच्या चळवळीनी विविध उपक्रमाच्या माध्यमातून उदा... व्याख्यानाच्या माध्यमातून आणि इतर उपक्रम, जेणेकरून मुक्ता साळवे यांचा निबंध. निबंधातील विचारधारा, मुक्ता साळवेची धर्मचिकित्सा आणि मुक्ता साळवेने सांगितलेले शिक्षणाचे महत्त्व समाजात रुजावे. जेणेकरून सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीला नवा आयाम निर्माण व्हावा . यापेक्षासह, क्रांती नायिका मुक्ता साळवे जयंती निमित्त मुक्ता साळवेच्या विवेकी आणि विज्ञानवादी विचारधारेला क्रांतिकारी अभिवादन!

डॉ. भगवान वाघमारे
निलंगा, जि. लातूर

# राजुरेश्वराच्या दर्शनासाठी उसळला जनसागर

## अंगारकी चतुर्थी; हजारो भक्तांनी घेतले 'श्री'चे दर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा. बाळासाहेब बोराडे**

**श्रीक्षेत्र राजूर :** जालना जिल्ह्याचे ग्रामदैवत तथा मराठवाड्यातील प्रसिद्ध गणपती संस्थान श्रीक्षेत्र राजूर येथील राजुरेश्वराच्या दर्शनासाठी अंगारकी चतुर्थी निमित्ताने भाविकांचा मोठ्या प्रमाणात जनसागर उसळला. जिल्ह्यासह मराठवाड्यातील विविध ठिकाणांहून पायी चालत येणाऱ्या भक्तांचे जत्थे अनवाणी पायांनी चालत आल्याचे दिसून आले.या वर्षी नववर्षाच्या स्वागतालाच अंगारकी चतुर्थी आल्याने गणेश भक्तांसाठी ही एक मोठी पर्वणीच ठरली.नववर्षाच्या संकल्पाबरोबरचआपली मनोकामना पूर्ण करण्यासाठी हजारो भक्तांनी श्रीराजुरेश्वराचे दर्शन घेतले.दर्शनाचा प्रथम मान कन्नड तालुक्यातील साखरवेल येथील जनार्धन विठ्ठल निर्मळ व सौ.सीताबाई निर्मळ दाम्पत्यास मिळाला.त्यांचा गणपती संस्थांच्या वतीने सन्मान करण्यात आला. केंद्रीय रेल्वेमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या सुविद्य पत्नी सौ. निर्मलाताई दानवे,आमदार नारायण कुचे,आदी मान्यवरांच्या हस्ते महागणपती श्रीराजुरेश्वराची पूजा व महाआरती करण्यात आली.यावेळी गणपती संस्थान विस्वस्थ गणेश मामा साबळे, सुधाकरराव दानवे,सरपंच प्रतिभाताई भुजंग, माजी सरपंच भाऊसाहेब भुजंग,उपसरपंच जिजाबाई मगरे,कार्यालयीन अधीक्षक प्रशांत दानवे,भगवानराव नागवे,श्रीरामपंच पुंगळे, ग्रामसेवक प्रमोद पुंगळे,'श्री'चे पुजारी मनोज साबळे,ज्ञानेश्वर साबळे,कृष्णा साबळे,ग्रामपंचायत सदस्य आप्पासाहेब पुंगळे,राहुल दरख, विनोद डवले, मोहिनीराज मापारी यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. श्रीच्या दर्शनासाठी आलेल्या भक्तांनी थंडीपासून बचावासाठी गरम कपड्यांचा वापर केला.संस्थांकडून विश्रांतीसाठी हॉल उपलब्ध करून दिला होता. गणपती संस्थांच्या माध्यमातून मंडपची व्यवस्था करण्यात आली होती.'श्री'चे सेवेकरी व स्वयंसेवकांकडून भाविकांसाठी फराळ व पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली होती.शासकीय रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी,कर्मचाऱ्यांनी भाविकांना आरोग्य सेवा पुरवली.आरोग्य विभागाकडून रुग्णवाहिक व आपत्कालीन विभागाकडून अग्निशामकदलाची गाडी सज्ज करून ठेवण्यात आली होती. भाविकांच्या वाहनांमुळे रस्त्यांच्याकडेला दुचाकी व चार चाकी वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली होती. वाहतुकीची कोंडी हाऊ नये म्हणून वाहनतळाची व्यवस्था करण्यात आली होती.भाविकांसाठी एस.टी बस सेवेच्या फेऱ्यात वाढवल्या होत्या.कायदा व सुव्यवस्थासाठी पोलिसांचा चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून हजारोंच्या संख्येने अनवाणी पायाने चालत येणाऱ्या भक्तांची संख्या लक्षात घेता कुठेही अनुचित प्रकार घडू नये म्हणून जिल्हा प्रशासन सज्ज झाले होते. जिल्हाधिकारी,पोलीस अधीक्षक यांचे विशेष लक्ष देऊन वेळोवेळी परिस्थितीचा आढावा घेत होते. उपविभागीय पोलीस अधिकारी,पोलीस निरीक्षक यांच्यासह फौजफाटा तैनात करण्यात आला होता.



**संस्थानकडून फुलांची सजावट व आकर्षक रोषणाई :** श्रीराजुरेश्वर गणपती संस्थानकडून मंदिराच्या कळसावर विविध रंगांची उधळण करणारी आकर्षक विद्युत रोषणाई तयार करण्यात आली होती .त्यामुळे मंदिर परिसर अधिकच प्रसन्न वाटत होता .मंदिराचे प्रवेशद्वार फुलमाळांनी सजवले होते .गाभाऱ्यातील मूर्तीस फुलांची आरास तयार केल्यामुळे श्रीराजुरेश्वरांची मुर्ती अधिकच खुलून दिसत होती . **विविध संस्थांकडून चहापान व फराळाची व्यवस्था :** अंगारकी चतुर्थी निमित्त पायी चालत येणाऱ्या भक्तांसाठी विविध धार्मिक, सामाजिक संस्थांच्या माध्यमातून भक्तांना फळे, चहापान व फळांची मोफत व्यवस्था करण्यात आली होती .अनेक भक्तांनी या सेवेचा लाभ घेतला .यावेळी पायी चालत येणाऱ्या भाविकांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून आले .



# फागणे येथील लोकनियुक्त सरपंचपदाचा विद्या नगराज पाटील यांनी घेतला पदभार

## वाजत गाजत गावातून काढण्यात आली भव्य मिरवणूक

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** तालुक्यातील फागणे ग्रामपंचायतीच्या लोकनियुक्त सरपंच पदाचा सौ. विद्या नगराज पाटील यांनी नुकताच पदभार स्वीकारला आहे. सदर हा पदभार सोहळा नगराज सूर्यवंशी,जिल्हा परिषद माजी सदस्य अरविंद जाधव, माजी लोकनियुक्त सरपंच गोकुळ शिंगवी, किशोर शिंगवी, यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला आहे. नवनिर्वाचित विजयी लोकनियुक्त सरपंच व सदस्यांची वाजत गाजत गावातून भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीकडे गावकऱ्यांचे लक्ष वेधले जात होते.

गाव गाडयाचा कारभार पाहणाऱ्या सरपंचाच्या अधिकारात विशेष वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये सरपंच पदाच्या निवडणुकीत मोठी चुरस पाहायला मिळाली. लोकनियुक्त सरपंच म्हणून सौ. विद्या पाटील यांची मोठ्या मताधिक्याने निवड झाली.त्यानीं प्रतिस्पर्धी उमेदवारांना धक्का देत मोठ्या मताधिक्याने मात केली. आज लोकनियुक्त सरपंच पदाच्या खुर्चीवर विराजमान होत सौ विद्या पाटील यांनी पदभार स्वीकारला आहे. सहाय्यक निवडणूक अधिकारी वाय एम भदाणे, ग्रामसेवक आ. एन. देवरे यांनी कामकाज पाहिले पोलीस बंदोबस्त ही मोठ्या प्रमाणात तैनात होता. सौ विद्या पाटील व सदस्यांनी पदभार स्वीकारल्यानंतर समस्त फागणे गावातील प्रतिष्ठित नागरिक व मान्यवरांनी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला. याप्रसंगी मा.जिल्हा परिषद सदस्य अरविंद जाधव, प्रथम लोकनियुक्त सरपंच गोकुळ शिंगवी, नगराज सूर्यवंशी, किशोर शिंगवी, बालू पाटील, सुभाष पाटील, भालू पाटील, काशिनाथ पाटील, मधुकर देवराम पाटील व आधी फागणे ग्रामस्थ यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'लोकविकास'वर संस्थापक पॅनलचे वर्चस्व

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** लोकविकास नागरी सहकारी बँक लि., औरंगाबादच्या पंचवार्षिक निवडणूक होवून मतमोजणीचा निकाल जाहिर करण्यात आला. या निवडणूकीत संस्थापक पॅनलचे एकूण १५ उमेदवारांचा भरघोस मतांनी एकतर्फी विजय झाला. मराठवाडयातील अग्रगण्य असलेल्या लोकविकास बँकेच्या संचालक मंडळ निवडणूकीवर संपुर्ण जिल्हयाचे लक्ष लागून होते. अत्यंत अटीतटीच्या झालेल्या लढतीत अखेर संस्थापक पॅनलने आपले एकतर्फी 16 पैकी 15 जागावर एकहाती विजय मोठ्या फरकाने संपादीत केला आहे. या निवडणूकीत पॅनलचे प्रमुख मार्गदर्शक महाराष्ट्र विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते तथा आमदार अंबादासजी दानवे, बँकेचे संस्थापक जे. के. जाधव, माजी आमदार नामदेवराव पवार, माजी उपमहापौर प्रशांत देसरडा यांनी प्रचाराचे नियोजन करून एकतर्फी विजय संपादन केला आहे. श्रीमंत उकिर्डे मिळालेले मते ( २८४७ ) भाऊसाहेब काळे मिळालेली मते ( २८२६ ) विजय खाचणे मिळालेले मते ( २६८० ) विनायक गवळी मिळालेली मते ( २७९२ ) मुरलीधर जगताप मिळालेले मते ( २५६२ ) जे. के. जाधव मिळालेले मते ( ३०८२ ) विनंत जाधव मिळालेले मते ( २८६२ ) माधवराव जेऊघाले मिळालेले मते ( २५७८ ) प्रशांत देसरडा मिळालेले मते ( २७५३ ) नामदेवराव पवार मिळालेले मते ( २८२४ ) श्री. दिपक अहिरे मिळालेले मते ( ३१०६ ) बद्रीनाथ ठोंबरे मिळालेले मते ( २९४७ ) गणेश नागरे मिळालेले मते ( ३०३९ ) विमल पोपट जाधव मिळालेले मते ( ३०४२ ) अनुराधा अंबादास दानवे मिळालेले मते ( ३२६० ) व उत्कर्ष पॅनलचे प्रमुख एकनाथ जाधव मिळालेले मते ( २८११ ) निवडणूक निर्णय अधिकारी एस.पी. काकडे यांनी निकाल घोषीत केला. त्यांना सुधाकर गायके, प्रदीप कदम आदींनी सहकार्य केले. निवडून आलेल्या नवनिर्वाचित संचालकांचे स्वागत बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संजय औटी यांनी केले. याप्रसंगी आमदार अंबादास दानवे यांनी सर्व नवनिर्वाचित संचालकांना बँकेच्या प्रगतीसाठी शुभेच्छा देवून सभासदांनी दाखविलेल्या विश्वासास पात्र होण्याचे आवाहन केले. याप्रसंगी संस्थापक जे. के. जाधव, माजी आमदार नामदेवराव पवार यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी अमित बोरसे, प्रा. भारत दौड, भगवान झुंबड, सचिन पवार, अरूण मलिक, यशवंत धनवटे, प्रा. महेश देशमुख, पोपट जाधव, राजेश मिरकर, अनिल मिरकर, प्रशांत चव्हाण, रंजना नामदेवराव पवार, सौ. सरस्वती जगन्नाथ जाधव, तृप्ती विक्रांत जाधव, ज्योती सचिन पवार, हिराबाई पंढरीनाथ धोत्रे, बँकेचे सहायक महाव्यवस्थापक वाल्मीक गुळे, शाखा व्यवस्थापक, अधिकारी व कर्मचारी व असंख्य सभासदांची उपस्थिती होती.





# पहिल्या महिला शिक्षिका फातिमा शेख यांची जयंती उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभागाच्या वतीने आज दिनांक 09 जानेवारी 2023 रोजी हॉटेल मोर्या येथे भारताची पहिली महिला शिक्षिका असलेल्या फातिमा शेख यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली या कार्यक्रमाला औरंगाबाद शहर जिल्हाध्यक्ष अनुसूचित जाती विभाग, डॉ. अरुण शिरसाट, प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. सोनाजी गवई, प्रा.शिलवंत गोपनारायण, किरण वाघ, विशाल वाघ, सचिन मोरे, महंमद अजरुद्दीन, गंगाधर साळवे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# पिशोरला पाणी पुरवठा योजनेकरिता 11 कोटी मंजूर

## पाणी पुरवठामंत्री गुलाबराव पाटील : पिशोर ग्रा.पं.च्या पाठपुराव्याला यश

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** कन्नड तालुक्यातील पिशोर येथील ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यानी ग्रामस्थाची पाण्याची वाढती गरज लक्षात घेऊन, माजी जिल्हा परिषद सदस्य श्रीमती संजनाताई जाधव यांच्या वतीने पाणी पुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्याकडे विषय मांडत, प्रस्ताव देत पाठपुरावा करुन योजना मंजुर करावी म्हणून साकडे घातले. सौ. जाधव यांनी विशेष लक्ष घातल्याने मंत्री गुलाबराव पाटील यांनी आपल्या पानी पुरवठा खात्याकडन 11 कोटी रुपये मंजूरि करून दिले. या योजनेमुळे 25 ते 30 हजार लोकसंख्या असलेल्या पिशोर गावाला मोठा लाभ होणार आहे. पिशोरसह ग्रापंचायत अंतर्गत येनाऱ्या वाघुलखेडा, शफेपुर, दिगर आदी तीन गावाला जल जीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनाकरिता अकरा कोटी रुपये ही योजना मंजुर झाल्याचे, टेंडर झाल्याचे सर्वस्वी श्रेय पाणी पुरवठा मंत्री गुलाबराव पाटील साहेब, सौ.संजना जाधव यांना जात असल्याचे मत उपसंरपच बाळासाहेब जाधव यांनी व्यक्त केले. याबद्दल सरपंच सरलाताई डहाके, उपसरपंच बाळासाहेब जाधव, माजी सरपंच पी. एम. डहाके, ग्रामविकास अधिकारी खाजुमिया पठान, ग्राम पंचायत सदश्य नारायण खडके, किसन कुशाबा मोकासे, महादू जाधव, सूर्यभान दहेतकर, कुसुबाई नवले, भूषण नवले, धीरज शेजवळ, ज्योती मोकासे, सविताबाई मोकासे, भास्कर जाधव, सविता नवले, शरिफाबी सय्यद, वैशाली निकम, रवी नीकम, अनिल मोकाशे , किशोर पवार, पुंजाजी सपकाल, अक्षय मोकासे, भागन आदिसह ग्रामस्थानी मनोगत व्यक्त केले.





# जुन्या आठवणींना उजाळा देत ओले झाले डोळे

## तब्बल 28 वर्षानंतर वर्गमित्र आले एकत्र

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** हृदयाच्या नाजुक कप्प्यात साठवलेल्या आठवणी तब्बल २८ वर्षानंतर त्याच ठिकाणी त्याच गड्यांसोबत त्याच वातावरणात उलगडल्या गेल्यातर भावना शब्दांच्याही पलिकडच्या ठरतात असाच काहीसा अनुभव युवावर्गाला आला. आठवणीची स्पंदने तशीच साठवत निरोप घेताना अनेकांना गहीवरून आले मित्र मिलाप हा आगळा वेगळा उपक्रम तालुक्यातील खंडाळा येथे पार पडला.

१९९३-९४ बॅचचे मित्र मैत्रीण तब्बल २८ वर्षांनी रविवारी (ता.८) गेट टु गेदर कार्यक्रमच्या माध्यमातून एकत्र आले. इतक्या वर्षांनी सर्वजण एकत्र आल्यावर एक भावनिक वातावरणाचा सोहळा ठरला. खंडाळा येथील जिल्हा परिषद शाळा येथे तत्कालीन शिक्षक, शशिकांत डवाळकर,नलिनी डवाळकर, विश्वनाथ गोरे, सीताराम पडवळ, कटारे,भागीनाथ जाधव, उषा काळे, बाबासाहेब खळेकर,कांबळे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. पाचवी ते दहावीपर्यंतचे सर्व शिक्षक यांची भेट झाल्याने या विधार्थ्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला. बालपण सगळे डोळ्या समोर जसेचा तसे उभे राहिले. जुन्या आठवणींना उजाळा देत जे सध्या हयात नाही त्यांना श्रदांजली वाहण्यात आली. त्यानंतर त्यांच्या कुटुंबातील महिलांना साडी, चोळी देवून सन्मान करण्यात आले.औक्षण करून आणि फुले उधळून शिक्षकांचे स्वागत करण्यात आले. यावेळी कैलास पवार, अनिल कर्डिले,मोबीन खान, लक्ष्मण कवार, एकनाथ पवार, विलास त्रिभुवन, छाया कटारे, भाऊसाहेब पठारे,सुनिल शिंदे यांनी मनोगत व्यक्त करताना भूतकाळातील आठवणी ताज्या केल्या. उपस्थित गुरुजनांचा शाल, श्रीफळ, भेटवस्तू आणि मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. दूर दूर गेलेले सर्व जण एकमेकांना भेटत होते. सेल्फी काढत होते. सर्वांच्या डोक्यावर मराठमोळा फेटा. सर्वांना चमचमीत जेवनाची मेजवानी, या कार्यक्रमाला शिल्पा डवाळकर, बाबासाहेब सुदाम, वंदना बागूल, अविनाश बागूल, संगिता बागूल, शिवाजी कटारे, मतीन खान, पूंजाहारी मोरे, मुस्ताक शेख, संजय पवार नवनाथ गाडेकर, मुकेश पवार, दिनकर पवार, दिनकर मगर आप्पासाहेब मगर, मिलींद पवार, अशोक ठाकरे, भाऊसाहेब पठारे, अशोक वाघमारे,भिकन शेख, रहिम शेख, अशोक दारुंटे, सतिश कवार, दत्तु थोरात, बबिता पवार, अयाज शेख, संतोष वेळंजकर, नितीन त्रिभुवन, कडू गरूड, कांतीलाल वाघचौरे, शेषनाथ पवार, संतोष थोरात, गणेश जगदाळे, प्रकाश पवार, विलास घायवट, अरूण शेवाळे, अशोक बनसोडे, राजेंद्र पवार, केशवराज पगारे,बाळू त्रिभुवन,ज्योती शिंदे, सुनिता जंगम, मंगल बागूल, संतोष झाल्टे, भाऊसाहेब जेजूरकर, नारायण जानराव, गोरख वेळंजकर, राजू बागूल आदिंची उपस्थिती होती.



## प्रा.डॉ. बालाजी कांबळे यांचा 'स्टार एज्युकेशन अवॉर्ड'ने सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बालाजी गुरुनाथ कांबळे यांचा 'स्टार एज्युकेशन अवॉर्ड 2023' ने नुकताच मुंबई येथे मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. प्रा.डॉ. बालाजी कांबळे हे दयानंद वाणिज्य महाविद्यालयात सहायक प्राध्यापक म्हणून कार्यरत असून, ते अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे (आयक्यूएसी) समन्वयक म्हणून काम पाहत आहेत. त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांचा मुंबई येथे स्टार एज्युकेशन अवॉर्ड देऊन सन्मान करण्यात आला. या पुरस्काराबद्दल डॉ. बालाजी कांबळे यांचे दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी, संयुक्त सचिव सुरेश जैन, प्रभारी प्राचार्य डॉ. राजाराम पवार यांच्यासह प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी आणि मित्र परिवार आदींनी अभिनंदन केले आहे.

## रायझिंग स्टार स्कूलचे 15 वे स्नेहसंमेलन उत्साहात

### चिमुकल्यांच्या चित्त थरारक प्रात्यक्षिकाने जिंकली प्रेक्षकांचे मने

आधुनिक केसरी न्यूज

**हर्सूल :** कै. तेजराव पाटील निकम बहुउद्देशीय शिक्षण संस्था संचलित रायझिंग स्टार स्कूलचे 15 वे स्नेहसंमेलन उत्साहात साजरे करण्यात आले. बालवर्गापासून ते दहावीपर्यंत च्या विद्यार्थ्यांनी या स्नेहसंमेलनात हिरीरीने भाग घेतला होत. विद्यार्थ्यांनी नृत्य, नाटके, पोवाडे, लावण्या, व विविध लोकनृत्यवर ठेका धरत आपल्या कलागुणांनी प्रेक्षकांना दात देण्यास भाग पाडले होत. शहीद जवानांना श्रद्धांजली देत या कार्यक्रमाची सर्वात झाली. गुणवत्त विद्यार्थ्यांचा सत्कार,व प्रशालेतून सैन्यात भरती झालेल्या जवानाच्या आई वडिलांच्या यथोचित सत्कार करीत,तीन तास झालेल्या या कार्यक्रमांमध्ये चिमुकल्यांनी आपल्या कलागुणांतून देशप्रेम, मातृप्रेम, आणि समाज हित जोपासणारा अमूल्य संदेश देण्याचा सुप्त प्रयत्न केला. स्नेहसंमेलनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार तथा जिल्हा बँकेचे चेअरमन नितीन पाटील, शाळेचे



अध्यक्ष सुभाष निकम, जिल्हा परिषद प्रभारी दिलीप निकम, शिवव्याख्याते संजय गायकवाड, भाग्यश्रीताई औताडे, प्राध्यापक जमाले, शिवव्याख्याते प्रदीप जगताप, सरपंचसविताताई निकम,अरुण निकम, संदीप चव्हाण, मुख्याध्यापिका कावेरी निकम, स्वाती निकम ,स्वाती लहाने, प्रशालेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह हजारो पालकांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंकुश मोकसे यांनी केले तर कावेरी निकम यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## परसोडा येथे क्रांतीज्योती सावित्रीमाईंना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त समरसता गत विधीच्या वतीने भारत देशामध्ये स्त्री शिक्षणाचा पाया उभारणाऱ्या स्त्रियांना हक्काची जाणीव करून देणाऱ्या आणि सुधारणेचा वसा उचलणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या एक शैक्षणिक आणि सामाजिक महिला क्रांतिकारी यांचे जीवन कार्य या विषयावर परसोडा गावातील महिला व मुलींनी आपले मनोगत व्यक्त केले. यामध्ये महिलांनी आपले विचार मांडत जीवनामध्ये शिक्षणाचे महत्व समाजासमोर प्रखरपणे



मांडले यासाठी प्रोत्साहन पर पारितोषिक देण्यात आले त्यामध्ये प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक काढण्यात आले. याप्रसंगी पर्यवेक्षक म्हणून नारायणराव कवडे, शिक्षक रमेश आबा धाडबळे यांनी काम पाहिले. भाषणात सहभागी झालेल्या सर्व महिलांना व विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी अश्विनी शिंदे, वैशाली तारक, सविता नजन, शुभांगी धाडबळे, अनुराधा निकम, स्वाती कवडे, वृषाली वाघ, स्वाती लालसरे, जयश्री कवडे, शरयू निकम, जिजाबाई राऊत, संगीता राऊत आदी महिलांची उपस्थिती होती.

## चालकाला मारहाण

आधुनिक केसरी न्यूज

**साक्री :** तालुक्यातील अष्टाणे शिवारात चौघांनी मालमोटार अडवून चालकाला मारहाण केली. तसेच त्याच्याकडील दोन भ्रमणध्वनी बळजबरीने हिसकावले. या प्रकरणी साक्री पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.या बाबत चालक मोहम्मद सिद्दीकी शब्बीर अहमद (३७, रा.मालेगाव) याने पोलिसात तक्रार दिली. तक्रारीनुसार चालक मालमोटार घेवून जात असताना अष्टाणे शिवारात मालवाहू मोटारीतून चौघे आले. त्यांनी मालमोटार अडवून चालकाकडील दोन भ्रमणध्वनी हिसकावून त्याला मालमोटारीसह रामपूर बारीच्या पुढे दोंडाईचा रस्त्याकडे घेवून गेले. तेथे चालकास लाकडी दांडक्याने मारहाण करून मालमोटारीतील सामानाची चोरी करण्याचा प्रयत्न केला.

# आयटक अंगणवाडी सेविकांचा वैजापूर पं.स.वर मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज



**वैजापूर :** अंगणवाडी सेविकांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देऊन वेतनश्रेणी लागू करावी, अंगणवाडी सेविकांना पेन्शन लागू करा, मिनी अंगणवाडी सेविकांना मोठ्या अंगणवाडी सेविकेइतकेच मानधन देऊन त्यांची मानधनातली तफावत दूर करण्यात यावी. अंगणवाडी सेविकांना नवीन मोबाईल देण्यात यावे या विसर इतर मागण्यांसाठी आयटकच्या अंगणवाडी बालवाडी कर्मचारी युनियनच्या वतीने वैजापूर पंचायत समितीवर मोर्चा काढण्यात येऊन निर्देशने करण्यात आली. आयटकचे राज्य उपाध्यक्ष तथा औरंगाबाद जिल्हाध्यक्ष प्रा. कॉम्रेड राम बाहेती आणि राज्य कौन्सिल सदस्या तथा वैजापूर तालुकाध्यक्ष कॉम्रेड शालिनी पगारे यांच्या नेतृत्वाखाली (दि. ९ जानेवारी) रोजी झालेल्या या मोर्चात दीडशे अंगणवाडी सेविका आणि मदतनीसानी सहभाग नोंदवला. मोर्चाची सुरुवात पंचायत समिती येथून सुरू होऊन महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे अभिवादन करून पुन्हा पंचायत समिती येथे मोर्चाचा समारोप करण्यात आला. वेतन आमच्या हक्काचे नाही कुणाच्या बापाचे, अंगणवाडी कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी मिळालीच पाहिजे, आयटक जिंदाबाद आशा घोषणा यावेळी देण्यात आल्या. राज्यभरात आयटकच्या वतीने आंदोलन सुरू आहेत त्याचाच भाग म्हणून आपल्या मागण्यासाठी आज वैजापूर येथे आंदोलन करण्यात आले. अंगणवाडी सेविकांना पीएसआय व जीवन ज्योति बीमा योजना यांचा लाभ द्या, पोषण ट्रॅकर ॲप पूर्णतः मराठीत करा, शासनाने वर्ष २०१९ मध्ये दिलेले मोबाईल हे आता खराब झालेले आहेत त्याचा डाटा स्पेस कमी आहे त्यामुळे ते हँग होतात रेंज धरत नाही काहींची चार्जिंग होत नाही झाली तर तात्काळ उतरते अशा अनेक समस्या त्या मोबाईल मध्ये झालेले आहेत त्यामुळे ऑनलाईन कामे करण्यास अडचणी येते म्हणून शासनाने नवीन मोबाईल संच उपलब्ध करून द्यावेत, अंगणवाड्यांना आहार पुरवठा करणाऱ्या बचत गट व अंगणवाडी सेविका यांची आहाराची बिले बजेट येऊनही गेल्या मे ते नोव्हेंबर पर्यंत दाखल केलेली असूनही मिळालेली नाही ती तात्काळ त्यांना देण्यात यावी, २०२० पासूनचा प्रवास भत्ता देयके थकीत आहे ती तात्काळ द्यावे, २०१८ पासून सेवानिवृत्त झालेल्या अंगणवाडी सेविका मदतनीस यांना सेवा समाप्ती लाभाची रक्कम मिळालेली नाही ती तात्काळ त्यांच्या खात्यावर जमा करण्यात यावी. यावेळी शबाना शेख, शोभा तांदळे, सोनी चव्हाण, पंचशीला धनेश्वर, संजीवनी पंडागळे, रंजना माळी, निर्मला बोरगे, ज्योती खडके यांच्यासह तालुक्यातील शिऊर, लोणी खुर्द, गारज, मनूर, लाडगाव, वैजापूर शहर, गाढे पिंपळगाव येथील शेकडो अंगणवाडी सेविका व मदतनिस सहभागी झाल्या होत्या.

# मान्यवरांना पुरस्काराचे वितरण

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, शेवगाव तालुका पत्रकार संघ व मराठी पत्रकार परिषद यांच्यावतीचे 'मराठी पत्रकार दिना' निमित्त दिला जाणारा ' सामाजिक पुरस्कार' नित्यसेवा रुग्णालयाच्या सिस्टर फ्रान्सिस्का, रेणुका माता मल्टीस्टेटचे संस्थापक डॉ. प्रशांत भालेराव व सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब चौधरी यांना तर 'पत्रकारीता क्षेत्रातील पुरस्कार पत्रकार महादेव दळे, राजेंद्र पानकर यांना तर वृत्तपत्र वितरण क्षेत्रातील पुरस्कार गहिनीनाथ बडे यांना जाहीर झाला आहे. पुरस्कार वितरण सोहळा व अक्षय मतिमंद विद्यालय व शेवगाव येथील उचल फाउंडेशनला साहित्य वाटप कार्यक्रम बुधवार ता.११ जानेवारी २०२३ रोजी सकाळी १० वाजता शेवगाव शहरातील स्वराज मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला असल्याची माहिती शेवगाव पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष कैलास बुधवंत, मराठी पत्रकार परिषदचे रमेश चौधरी व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष सचिन सातपुते यांनी दिली.यावर्षीचा सामाजिक क्षेत्रातील पुरस्कार नित्यसेवा हॉस्पिटलच्या सिस्टर फ्रान्सिस्का, अर्थतज्ञ डॉ. प्रशांत भालेराव, शेवगाव रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष बाळासाहेब चौधरी यांना जाहीर झाला आहे. तर पत्रकारीता क्षेत्रातील पुरस्कार वीरभूमीचे संपादक महादेव दळे, पत्रकार राजेंद्र पानकर यांना तर वृत्तपत्र वितरण क्षेत्रातील पुरस्कार बोधेगाव येथील गहिनीनाथ बडे ,आंतरराष्टीय कबड्डी स्पर्धेत भारताचे कर्णधार पद भुषवित सुवर्ण पद मिळाल्याबद्दल तालुक्यातील लाखेफळ येथील वैभव गर्जे यांना जाहीर झाला आहे.

# पेंशनर्सच्या मागण्यासाठी पैठण येथे महामेळावा

आधुनिक केसरी न्यूज



**पैठण:** राज्याच्या ३०जिल्ह्यातील सरकारी खात्यातील तसेच जि.प. खात्यातील दीड हजार सेवा निवृत्त आपल्या विविध मागण्यांसाठी नाथांच्या पैठण नगरीत शनिवार रोजी राज्याचे रोजगार हमी मंत्री संदीपान भुमरे यांना मागण्या मान्य व्हाव्यात म्हणून गळ टाकली,केंद्र सरकारच्या निवृत्त कर्मचाऱ्यांना दर महा वैद्यकीय भत्ता मिळतो तो राज्यातील कर्मचाऱ्यांना मिळावा, राज्यातील पेंशनर्स वयाच्या८०--८५ वर्ष पेक्षा अधिकचे आहेत त्याचे केंव्हाही बरे वाईट होऊ शकते या साठी सातव्या वेतन आयोगाचे थकीत दोन हप्ते शासनाने तात्काळ द्यावे, सरकारी सेवा निवृत्त कर्मचारी व खाजगी अनुदानित शाळा निवृत्त कर्मचारी यांना जिल्हा कोषागार कार्यालयातून पेंशन मिळते तशी राज्यातील जि.प.च्या सेवानिवृत्त कर्मचारी यांना ही जिल्हा कोषागार कार्यालयाकडून दर महिन्याला पेंशन मिळावी, केंद्र प्रमुख एक वेतन वाढ त्वरित अदा करावी,३०जून रोजी सेवा निवृत्त झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांना सर्वोच्च न्यायालय आदेशानुसार एक वेतन वाढ तात्काळ मंजूर करावी, अंथरुणावर खिळलेल्या सेवा निवृतांना घरी जाऊन पेंशन द्यावी, वैद्यकीय सेवेचे लाभ सेवा निवृतांना मिळावे या मागण्या मंजूरसाठी राज्यातील पेन्शन नी.ना. भुमरे यांना विनंती, त्यांनी ह्या मागण्या मा. मुख्यमंत्री याच समोर ठेवून मान्य करण्याची विनंती करण्यात येईल, असे आश्वासन याप्रसंगी दिले.

# प्रेयसीच्या जाचाला कंटाळून युवकाची आत्महत्या

## आत्महत्येस कारणीभूत ठरलेल्या प्रेयसीविरुद्ध फर्दापूर ठाण्यात्य गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील पळसखेडा येथील एका युवकाने प्रेयसीच्या जाचाला कंटाळून प्रेयसीच्याच राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली असल्याचे निदर्शनास आले आहे. सविस्तर माहिती अशी की, सोयगांव तालुक्यातील पळसखेडा येथील मयत रहिवासी भीमराव प्रकाश बोराडे वय 33 वर्षे याचे आणि गावातीलच संगीता उर्फ शर्मिला उस्मान तडवी राहणार पळसखेडा हिच्या सोबत अनेक दिवसापासून प्रेम प्रकरण होते.परंतु या दोघांचे नेहमीच वाद होत होते त्यामुळे मयत भिमराव प्रकाश बोराडे हा त्रस्त झालेला होता.

शेवटी त्याने त्याची प्रेयसी संगीता ऊर्फ शर्मिला उस्मान तडवी हिच्या जाचाला कंटाळून पळसखेडा ता सोयगाव जि औरंगाबाद येथील प्रेयसीच्याच राहत्या घरी दिनांकः ०७/०१/२०२३ रोजी सायंकाळी ८:३० गळ्याला फास लावून आत्महत्या केली. सदर युवकांच्या आत्महत्येस कारणीभूत ठरलेल्या त्याची प्रेयसी संगीता उर्फ शर्मिला उस्मान तडवी हिच्या विरोधात मयताचे वडील प्रकाश शंकर बोराडे वय 79 वर्षे व्यवसाय शेती पळासखेडा तालुका सोयगाव जिल्हा औरंगाबाद यांनी फर्दापुर पोलीस स्टेशनला तक्रार देऊन कारवाईची मागणी केली होती. त्याच्या तक्रारीवरुन आरोपी संगीता ऊर्फ शर्मिला तडवी हिच्या विरुद्ध आत्महत्येस कारणीभूत ठरली म्हणून फर्दापूर पोलीस स्टेशनमध्ये दिनांक ०९/०१/२०२३ रोजी गु र न . 03/2023 कलम 306 भा द वि प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदर प्रकरणाचा तपास कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलीस निरीक्षक डी.बी. वाघमोडे हे करत आहे.

# जॉनी लिव्हरने जिंकली सिल्लोड येथे उपस्थितांची मने

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** येथे सादर केलेल्या मॅजिक महोत्सव २०२३ अंतर्गत सांस्कृतिक महोत्सात टीव्ही शो वरील प्रसिद्ध असलेले महाराष्ट्रातील हास्य जत्रा तील कलाकारांनी तुफान विनोदी सादरीकरण केले. त्याच्या विशेष अंदाजाने उपस्थित असलेल्या मान्यवरांचे मने जिंकली. प्रसिद्ध जादूगार रेड्डी याने सादर केलेल्या मॅजिक शो भरपूर दाद मिळाली. नृत्यांगना सुरेखा काळे ने सादर केलेल्या लावण्यावर सिल्लोडकर थिरकले यावेळी कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांनी आलेल्या कलाकारांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास रसिक प्रेक्षकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थित होती यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष गोपीचंद जाधव, माजी सभापती धरमसिंग चव्हाण, बबलूशेट हाझी साहेब व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# कु. रुद्रांश आकाश ठाकूरचा वाढदिवस 'मायेची ऊब' देत उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** समाजात वाढदिवसाच्या निमित्ताने जल्लोष रस्त्यावर केक कापने , इतरांना त्रास असे आपण नित्याने आपण पाहतोय, परंतु ठाकूर परीवाराच्या वतीने ९ जानेवारी रोजी कु. रुद्रांश आकाश ठाकूर याच्या वाढदिवसानिमित्त औरंगाबाद शहरातील बाबा साई एड्स ग्रस्थ आश्रम मध्ये गरीब व कुडकुडत असणारे लहान लहान मुले व मुली अशा अनेकांना थंडीच्या दिवसात मायेची ऊब अर्थात चादरी वाटप करण्यात आल्या. कु. रुद्रांश आकाश ठाकूर च्या प्रथम वाढदिवसाचे त्यानिमित्ताने ठाकूर परीवाराच्या वतीने जोरदार वाढदिवसाच्या निमित्ताने कार्यक्रम करण्याचे ठरले.आजघडीला थंडीचा कडाका वाढला आहे . ही बाब समजुन काही वेगळं करावे व ठाकूर परीवाराच्या वतीने कु. रुद्रांश च्या प्रथम वाढदिवसाचे औचित्य साधून वेगळा उपक्रम व अभिनंदनीय म्हणून चादर वाटप कार्यक्रम घेण्यात आला.

यावेळी प्राचार्य तथा पत्रकार शिवाजी गायकवाड,पत्रकार जावेद शेख,शिवसेना उपविभाग प्रमुख चरणसिंग राजपूत,युवा उद्योजक सागर जाधव, फंदे साहेब अमोल पाईककडे,रवी बारवाल,रवींद्र प्रधान,राजू हिवाळे,रोहित मोटे,अमोल कहाते, समवेत आदी उपस्थित होते. या उपक्रमाचे सर्व स्तरातून अभिनंदन होते आहे.





# अंगारकी चतुर्थी कथा

आधुनिक केसरी न्यूज

मंगळवारची संकष्टी चतुर्थी "अंगारकी " म्हणून का संबोधिले जाते ह्या बाबतची उपयुक्त माहिती जाणून घ्या. आपल्या हिंदू धर्मातली सहसा सर्व गणेश भक्त संकष्टी चतुर्थीच्या दिवशी उपवास धरतात. आपापल्या घरी संध्याकाळी देव्हाऱ्यातल्या मंगलमूर्ति श्रीगणेशा ची पूजा करून बाप्पाला दुर्वा आणि मोदक अर्पण केले जातात. आणि चंद्रोदया नंतर मात्र गणपती श्लोक वाचून मगच हा उपवास सोडला जातो. परंतु हीच संकष्टी जेंव्हा मंगळवारी येते तेंव्हा हिला अंगारकी चतुर्थी म्हणून संबोधिले जाते. ह्या मागची कथाही तितकीच रंजक आहे. कृतयुगात अवंती नगरीत वेदवेत्ते अग्निहोत्री ऋषी भरद्वाज हे महान गणेशभक्त असून त्यांनी त्या युगापासूनच मानवसृष्टी ला गणेश पूजेचे महत्त्व पटवून दिले होते. ह्या ऋषींकडूनच पृथ्वीच्या गर्भातून अंकारक नामक, जास्वंदी वृक्षाच्या सानिध्यात रक्तवर्णीय भौमपुत्र जन्माला आला होता जो सात वर्षांचा झाल्यावर पृथ्वीनं त्याला पुन्हा भरद्वाज ऋषींच्या स्वाधीन केले होते. ऋषींनी त्याचे उपनयन केले, वेद शिकविले आणि गणेशमंत्र देऊन उपासना करायला सांगितलं. त्यानंतर हा मुलगा अरण्यात गेला. त्यानं एक सहस्त्र वर्षे तप करून गणेशाला प्रसन्न करून घेतले आणि हाच तो दिवस होता मंगळवारी आलेल्या संकष्टी चतुर्थीचा. स्वर्गात राहून अमृतप्राशन करायचा आणि त्रैलोक्यात विख्यात व्हायाचे वरदान " त्यानं प्रसन्न झालेल्या श्रीगणेशा कडे मागितीला. यावर गणेशानं सुद्धा आपल्या परम भक्ताला हे वरदान दिले की, "ह्यापुढे भविष्यात येणाऱ्या मंगळवार ची संकष्टी चतुर्थी ही तुझ्याच अंगारीका ह्या नांवाने ओळखली जाऊन संबंधित उपासकास २१ संकष्टी केल्याची फलप्राप्ती ह्या चतुर्थीमुळे मिळेल. आणि तुझ्या ह्या सहस्त्र वर्षाच्या तपश्चर्येचे पुण्य युगानुयुगे त्यांच्यातही वाटले जाऊन त्यांच्या इच्छित मनोकामना पूर्ण होतील. ते ऋणमुक्त होतील. अशाप्रकारे त्रैलोक्यात तू सुविख्यात होशील आणि तुझं नाव भूमिपुत्र म्हणून भौम, अगारका सारखा लाल आहेस म्हणून अंगाकर व शुभ करण्याची शक्ती असेल म्हणून मंगळ ह्या नांवे तुला ब्रम्हांडातल्या आकाशात ग्रहांमध्ये स्थान मिळेल व तू सदैव अमृत पान करशील. त्यामुळेच गणेशाच्या ह्या वरदानामुळे तेंव्हा पासून अंगारकी चतुर्थीला अत्यंत महत्त्व प्राप्त झाले. म्हणूनच ज्या गणेश भक्तांना प्रतिमासी येणाऱ्या संकष्टी चतुर्थी चे व्रत/उपवास करणे जमत नसल्यास अशांनी अंगारकी मात्र न विसरता व न चुकता आवर्जून करावी की ज्यामुळे २१संकष्टी केल्याची फलश्रुती नक्कीच लाभणार असे वेदवचन ही दिले गेले आहे. म्हणूनच आजची मंगळवारी येणारी संकष्टी चतुर्थी ही ह्या वर्षातली पहिली वहिली अंगारकी योग असल्याने आपल्याही काही मनोकामना पूर्ण होण्यासाठी अथवा अडकलेले महत्वाचे ईप्सित कामे मार्गी लागण्यासाठी, इच्छुकांनी आज अंगारकी मात्र अवश्य धरावी. कारण आज ब्रम्हांडातील मंगळ ग्रहाच्या पुण्य लहरी कैक सहस्त्र पटीने पृथ्वी कडे आकर्षित होत असतात आणि त्यामुळे कुणीही उद्याची चतुर्थी धरणाऱ्यांस त्या पुण्यलहरींचा त्याला निश्चितच फायदा होतो हे मी स्वानुभवाने सांगतो. आणि ह्या दिवशी मात्र खालील श्लोक म्हणुन, चंद्रदर्शन करुनच उपवास सोडावा. तसेच हेही ध्यानात असु द्यावे की कुणाच्याही सांगण्यावरून व स्वतःच्या मनाने कोणत्याही परिस्थितीत संपूर्ण दिवसाचा अखंड उपवास धरुन दुसऱ्या दिवशी उपवास सोडण्याची पध्दत मात्र अवलंबू नये. कारण मुळातच बाप्पा ला भूक अनावर होत असल्याने त्याला त्याचे भक्तगण उपाशी पोटी झोपलेले कदापि रुचत नाही. म्हणून त्याच्याच आदेशा नुसार चतुर्थीला चंद्रदर्शन करुन उपवास सोडणे केंव्हाही श्रेयस्कर आणि फलप्राप्ती निश्चितच. गणेश अंगारकी श्लोक गणेशाय नमस्तुभ्यं, सर्व सिद्धि प्रदायक । संकष्ट हरमे देवं, गृहाणार्घ्यम् नमोऽस्तुते ॥ कृष्णपक्षे चतुर्थ्यातु , सम्पूजितं विधूदये। क्षिप्रं प्रसीद देवेश, अंगारकाय नमोऽस्तुते ॥



# चाळीसगावरोड पोलिसांनी २४ तासांत जबरी चोरी करणाऱ्यांना ठोकल्या बेड्या

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील तिरंगा चौक ते लोकमान्य हॉस्पिटल दरम्यान मोबाईलवर बोलत जात असलेल्या तरुणाच्या हातातून मोबाईल हिसकावून धुमस्टाईल जबरी चोरी करणा दोघांना अवघ्या २४ तासात जेरबंद करीत चाळीसगांव रोड पोलिसानी मुद्देमाल हस्तगत केला आहे. याप्रकरणी चाळीसगांव रोड पोलिस ठाण्यात ८ रोजी मोहम्मद मुस्तफा मोहम्मद हसन अन्सारी ( वय ३५ ) रा . अन्सार नगर , धुळे या तरुणाने फिर्याद दिली होती रात्री 9.30 वाजेला तो तरुण जेवण करून तिरंगा चौकातून मोबाईलवर बोलत जात असताना पाठीमागून मोटरसायकलवर आलेल्या दोघा अनोळखी तरुणांनी धूमस्टाईल मोबाईल हिसकावून पळ काढला होता . या गुन्हयाचा तपास पथक करत असताना अग्रेसन चौक या ठिकाणी पेट्रोलिंग करताना त्यांच्यासमोरून दोन जण मोटरसायकलवर भरधाव वेगाने गेल्याने त्यांच्यावर पोलीस पथकाला संशय आला.. पथकाने त्वरित त्यांचा पाठलाग करून मालेगाव रोडवरील रेल्वे फाटका जवळ त्यांना अडवून त्यांचे अंगझडती घेतली असता त्यांच्या ताब्यातून चोरी गेलेले मोबाईल हस्तगत केले. त्यांना अधिक विचारपूस केली असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यांना ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणून विचारपूस केली त्यात आणखी एक मोबाईल त्यांनी काढून दिला. या कारवाई गुन्ह्यात वापरलेले 80 हजाराची मोटरसायकल दहा हजाराचा आणि 20 हजाराचा असे दोन मोबाईल असा एकूण 1 लाख 10 हजाराचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. अवघ्या 24 तासात जबरी चोरी करणाऱ्या चोरट्यांना अटक करण्यात आली आहे.

# लोकमान्य टिळक - अंकनाद पाढे सात्मीकरण स्पर्धा उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त, पुणे महानगरपालिकेच्या प्राथमिक विभागातील सर्व माध्यमांच्या शाळांमधील सर्व विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासासाठी, महाराष्ट्र शासन, राज्य मराठी विकास संस्था, पुणे महानगर पालिका - प्राथमिक शिक्षण विभाग आणि मॅप एपिक कम्युनिकेशन प्रायव्हेट लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने लोकमान्य टिळक - अंकनाद पाढे सात्मीकरण स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत पालिकेच्या प्राथमिक विभागाच्या २६५ शाळांमधल्या ८८००० विद्यार्थ्यांपैकी १२५ शाळांमधील, ३०००० विद्यार्थी, शाळा स्तर, क्षेत्रीय स्तर आणि शेवटी मनपा स्तर अशा तीन टप्प्यात स्पर्धेत सहभागी झाले. या उपक्रमाला आयुक्त श्री विक्रमकुमार, माननीय अतिरिक्त आयुक्त रवींद्र बिनवडे, प्राथमिक शिक्षण विभागाच्या प्रशासकीय अधिकारी माननीय डॉ .मीनाक्षी राऊत, प्रकल्प अधिकारी माननीय डॉ. मनोरमा आवारे यांचे महत्त्वपूर्ण मार्गदर्शन आणि मा. शुभांगी चव्हाण,राजेंद्र ढुमणे, सर्व सहायक प्रशासकीय अधिकारी, नोडल शिक्षक, परीक्षक अशा सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले. या अंकनाद पाढे सात्मीकरण उपक्रमातील अंतिम टप्प्याच्या स्पर्धा शुक्रवार दि ६ जानेवारी २०२ आणि शनिवार दि ७ जानेवारी २०२३ रोजी आयोजित करण्यात आल्या. या अंतिम स्पर्धांचा उद्घाटन समारंभ - शुक्रवार दि ६ जानेवारी २०२३ रोजी, सकाळी १०.३० वाजता,वीर नेताजी पालकर प्राथमिक शाळा, शिवाजीनगर पोलिस रुग्णालयामागे, मॉडर्न कॉलेजसमोर, शिवाजीनगर, पुणे येथे संपन्न झाला.
या वेळेस पुणे प्रशासकीय अधिकारी माननीय डॉ .मीनाक्षी राऊत, समग्र शिक्षा अभियानाच्या प्रकल्प अधिकारी माननीय डॉ .मनोरमा आवारे, जनता सहकारी बँक, पुणे यांचे अध्यक्ष माननीय श्री .अभय माटे, मॅप एपिक कम्युनिकेशन प्रा. लि.चे संचालक श्री .पराग गाडगीळ, मंदार नामजोशी, निर्मिती नामजोशी हे मान्यवर उपस्थित होते.



# बारा वर्षांपासून आयटीआय वसतिगृहाचे बांधकाम प्रलंबित; पुढारी लक्ष देतील का ?

## खासदार - आमदारांनी लक्ष घालण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज


**बाबुराव गोणारकर**
**धर्माबाद :** शहरातील आयटीआय महाविद्यालयात वेगवेगळ्या तालुक्यातील ग्रामीण भागातून शेकडो विद्यार्थी येथे शिकण्यास येतात. या विद्यार्थ्यांच्या राहण्याची सोय व्हावी यासाठी बारा वर्षापासून साठ खोल्यांचे निवासी वस्तिगृहाचे बांधकाम चालू आहे. पुरेशा निधी अभावी हे काम अजूनही अपूर्ण असल्यामुळे खासदार प्रतापराव पा.चिखलीकर व आमदार राजेश पवार यांनी यात लक्ष घालावे अशी मागणी होत आहे.
धर्माबाद शहरात 1977 पासून आयटीआय महाविद्यालय कार्यरत आहे.येथे टर्नर, फिटर,वेल्डर, इलेक्ट्रीशियन,वायरमन,कारपेंटर,मोटर व ट्रॅक्टर मेकॅनिक यासारखे कौशल्यधिष्ठित कोर्स शिकविले जातात.या महाविद्यालयातून शिक्षण - प्रशिक्षण घेतलेल्या हजारो विद्यार्थ्यांना उदरनिर्वाहाचे साधन मिळाले आहे. शहरातील आयटीआयची जुनी वास्तु मोडकळीस आल्यामुळे हे महाविद्यालय बाळापूर शिवारात बिद्राळी रोडवर हलविण्यात आले.येथेच 2012 पासून तीनशे विद्यार्थ्यांसाठी साठ खोल्यांचे,तीस शौचालय,छत्तीस स्नानगृह,शाकाहारी व मांसाहारी स्वतंत्र स्वयंपाक गृह व भोजन कक्ष असलेले साडेपाच एकर जमिनीवर प्रशस्त व आद्यवत वसतिगृहांच्या इमारतीचे बांधकाम सूरु आहे.
या इमारतीसाठी 2012 मध्ये पाच कोटी पाच लक्ष रुपये मंजूर झाले.त्यासाठी निविदा काढण्यात आली.प्रतिक कंस्ट्रक्शनला कामही मिळाले.मात्र वाढत्या महागाईमुळे हा निधी अपुरा पडू लागला.परिणामी इंटिरियर कामे अपूर्ण राहिली.यामध्ये दार, खिडक्या,टाईल्स,टॉयलेट, बाथरूम,विद्युत पुरवठा, रंगरंगोटी यासारखी कामे पेंडिंग राहिली.

खासदार व आमदार महोदयांनी केवळ फोटोशेषन मध्ये वेळ न घालविता वसतिगृहाचे अपूर्ण काम पूर्ण करण्यासाठी निधी मिळवून द्यावा .
**गणेश गिरी, उपाजिल्हा प्रमुख, शिवसेना ( ठाकरे गट )**

धर्माबाद शहरातील आयटीआय मध्ये गोरगरीबांचे मुले शिक्षण घेत असून त्यांना सोय होण्यासाठी हे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे .
**मनसे शहर अध्यक्ष सचिन रेड्डी**



आयटी महाविद्यालय शहरापासून लांब असल्यामुळे शहरात भाड्याच्या खोलीत राहणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवासाचे भाडे व खोली भाडे हा दुहेरी भुर्दंड सहन करावा लागतो .पण प्रश्न हा आहे . जेथे मलिदा असतो तेथे उपोषण करणारे, मोर्चे काढणारे, निवेदन देणारे,आंदोलन करणारे नेते व पुढारी मात्र आपल्या शहरातील वसतिगृहाचे बांधकाम सहा वर्षांपासून निधी अभावी पेंडिंग आहे या बाबतीत मौन का ?खासदार - आमदार महोदय वारंवार धर्माबाद मध्ये येऊन आपल्या वेगवेगळ्या ठिकाणी भेटी देतात . परंतु आपल्या मतदार संघातील वसतिगृहाचे बांधकाम पुरेसा निधी नसल्यामुळे पेंडिंग आहे .त्यास भेट देऊन काही मार्ग काढणार का ? निवडणुकीच्या पूर्वी रोजगार मेळावे भरण्यापेक्षा ज्या शिक्षणातून रोजगार मिळतो त्यास चालना देणार का ? आमदार व खासदारांनी यात लक्ष घालून हे अपूर्ण बांधकाम पूर्णत्वास न्यावे अशी मागणी जनतेतून होत आहे .

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in